दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ३६ । रविवार १५ नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

महाराष्ट्रात दूध ४ रुपयांनी महागणार; नवे दर सोमवारपासून लागू



पुणे : दिवाळीनंतर सर्वसामान्यांच्या खिशाला महागाईची आणखी झळ बसणार आहे. राज्यातील प्रमुख सहकारी आणि खासगी दूध उत्पादक संघांनी गाय आणि म्हशीच्या दुधाच्या दरात प्रतिलिटर चार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार (दि.१६ नोव्हेंबर) पासून या दरवाढीची अंमलबजावणी होणार असल्याने ग्राहकांना दूध खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. राज्यातील ४५ दूध संघांचे ५० प्रतिनिधी उपस्थित असलेल्या बैठकीत दरवाढीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. अमूलने नुकतीच दूधदरवाढ केल्यानंतर आता गोकुळ, चितळे, कात्रज आणि सोनाई यांसारख्या प्रमुख दूध ब्रँडच्या किमतीही वाढणार आहेत.

पाकिस्तानच्या जबड्यातून विजय हिसकावला!

नवव्यांदा आशिया चषकावर भारताची मोहोर!

- एक गडी राखून ऐतिहासिक विजय
- ३३७ धावांचे महाकाय लक्ष्य पार
- शेवटच्या षटकांत मोहित उल्वाची वादळी फटकेबाजी
- चिंगुरूपता वेंकटाची मोलाची साथ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : क्रिकेटच्या मैदानावर भारत-पाकिस्तान सामना म्हटला की उत्कंठा, थरार आणि शेवटच्या चेंडूपर्यंत रंगणारा संघर्ष हे समीकरण ठरलेलेच! १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेतील अंतिम लढतीत भारतीय युवा शिलेदारांनी याच थराराची प्रचिती देत अशक्य वाटणारा विजय शक्य करून दाखवला. पाकिस्तानने विजयासाठी ठेवलेले ३३७ धावांचे डोंगराएवढे आव्हान भारतीय संघाने तब्बल एक गडी राखून पार केले. पराभवाच्या छायेत सापडलेल्या भारतीय संघाने अखेरच्या क्षणी पाकिस्तानच्या हातातोंडाशी आलेला विजय

■ भारताला १६ चेंडूंत विजयासाठी २९ धावांची गरज असताना दहाव्या क्रमांकावर चिंगुरूपता वेंकटा मैदानात उतरला. आता पराभव टाळणेही कठीण वाटत असताना म ोहित उल्वाने मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. अवघ्या २६ चेंडूंत ४९ धावांची वादळी खेळी करीत त्याने सामन्याचे चित्रच पालटले. चिंगुरूपता वेंकटानेही ११ धावांची मोलाची साथ देत मोहितला भक्कम पाठबळ दिले. अखेरच्या १६ चेंडूंमध्ये भारतीय फलंदाजांनी आवश्यक धावा वसूल करीत एक गडी राखून विजयावर शिक्कामोर्तब केले.

हिसकावून घेतला आणि नवव्यांदा आशिया चषकावर आपले नाव कोरले. या विजयाने भारतीय क्रिकेटच्या युवा शिलेदारांनी पुन्हा एकदा आपली जिद्द, चिकाटी आणि विजिगीषू वृत्ती सिद्ध केली.



३३७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने दमदार सुरुवात केली. सलामवीर लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांनी पहिल्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी करीत विजयाचा पाया रचला. आर्यवीरने ५८ धावांची खेळी केली. मात्र, त्याची विकेट पडल्यानंतर भारतीय डावाला गळती लागली. विके विनीथ (२४), अर्जुन राजपूत (१६) आणि यशबर्धन चव्हाण (९) हे स्वस्तात बाद झाले. दुसऱ्या बाजूने भक्कमपणे उभा असलेला लक्ष्य रायचंदानीही ८० धावांवर बाद झाल्याने भारताच्या विजयाच्या आशांना मोठा धक्का बसला.

त्यानंतर अन्वय द्रविडकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, तो १९ धावांवर धावबाद झाला. आर्यन सहानी (९) आणि काव्या पटेल (०) यांनीही निराशा केली. परिणामी भारतीय संघाची अवस्था आठ बाद २५२ अशी झाली. विजयासाठी आवश्यक धावा आणि हातात उरलेल्या मोजक्या विकेट्स पाहता पाकिस्तानचा विजय निश्चित मानला जात होता. भारतीय ड्रेसिंग रूममध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, भारतीय युवा खेळाडूंनी हार मानली नाही. अशा कठीण **(पान ४ वर)**

हळदीच्या कार्यक्रमात चाकूहल्ला; तरुण गंभीर जखमी

मध्यस्थी करणाऱ्याचाही हात जखमी; आरोपी प्रशांत काळे याला पोलिसांकडून अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : मुलीच्या हळदी समारंभात सुरू असलेल्या नाचगाण्याला अचानक हिंसक वळण लागून एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात भारत विष्णू धोत्रे (वय २२, रा. बाजारतळ, वार्ड क्रमांक ३, श्रीरामपूर) हा गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी लोणी येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. हल्लेखोराला रोखण्याचा प्रयत्न करणारा अक्षय विष्णू धनवटे (वय २८) याच्याही उजव्या हाताला दुखापत झाली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रशांत प्रल्हाद काळे (वय ३१, रा. मोरगेवस्ती, वार्ड क्रमांक ७, श्रीरामपूर) याला अटक केली आहे.



ही घटना १३ नोव्हेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास बाजारतळ परिसरातील तलवार बिल्डिंगसमोर, वार्ड क्रमांक ३ येथे घडली. निरंजन दळवी यांच्या घरी मुलीच्या हळदीचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी साउंड सिस्टीमच्या तालावर कुटुंबीयांसह काही तरुण नाचत होते. अचानक नाचणाऱ्यांपैकी काही जण अक्षय कॉर्नर, वार्ड क्रमांक ७ च्या दिशेने पळू लागले. त्याचवेळी प्रशांत काळे याने भारत धोत्रे याच्या पाठीवर चाकूने वार केला. या हल्ल्यात भारत गंभीर जखमी झाला.

भारतला वाचविण्यासाठी अक्षय धनवटे मध्ये पडला. त्याने आरोपीच्या हातातील चाकूचे पाते पकडण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याच्या उजव्या हाताला जखम झाली. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला.

जखमी भारत धोत्रे याला साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्याला लोणी येथील पीएमटी रुग्णालयात पाठविण्यात आले. अक्षय धनवटे याच्यावर श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अक्षय धनवटे याच्या जबाबावरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुरनं. ११०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ११८(१) प्रमाणे १४ नोव्हेंबर रोजी पहाटे २.०८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी शोध घेऊन आरोपी प्रशांत काळे याला अटक केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिखरे करीत आहेत.

भंडारदरा आणि निळवंडे धरणातून आजपासून सिंचन आवर्तन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी / ममदापूर : टंचाई परीस्थीतीच्या पार्श्वभूमीवर भंडरदारा धरणातून बिगरसिंचनाचे आणि निळवंडे धरणातून सिंचनाचे आवर्तन रविवार दिनांक १५ नोव्हेंबर पासून सुरू करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

मागील काही दिवसांपासून भंडारदरा धरणातून पाणी सोडण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत होती.लोकप्रतिनीधी तसेच ग्रामस्थ शेतकरी यांच्या शिष्टमंशिष्टमंडळाने मंत्री विखे पाटील यांची भेट घेवून नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई विचारात घेवून आवर्तन सोडण्यची विनंती केली होती.



मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची लोणी येथे बैठक घेवून भंडारदरा आणि निळवंडे धरणातील उपलब्ध पाण्याचा साठा तसेच भविष्यातील नियोजन याची सविस्तर माहीती जाणून घेतली.सद्यस्थितीत पाण्यची मागणी वाढल्याने आवर्तनाचे नियोजन करावे आशा सूचना त्यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

भंडारदरा धरणातून रविवार दि.१५नोव्हेंबर पासून बिगरसिंचन आवर्तन सोडण्यात येणार असून,नदीकाठच्या गावांसह श्रीरामपूर शहराला या आवर्तनाचा मोठा दिलासा मिळणार आहे.अन्य तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांना याचा लाभ होईल असे नियोजन करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

निळवंडे धरणातून दि.१५नोव्हेंबर पासून सिंचनाचे आवर्तन सोडण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून,डावा आणि उजव्या कालव्यांच्या कार्यक्षेत्रातील पिकांना या आवर्तनाचा लाभ होईल गावांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई काहीप्रमाण दूर होईल.दोन्ही धरणातून सुरू होणार्या आवर्तनाचे नियोजन अधिकार्यांनी अतिशय संवेदनशीलपणे करावे. पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले आहेत.

साईसेवेत खळबळ !

घोटाळ्यांचे पुरावे पुसण्यासाठी इतिवृत्त पुस्तकेच गायब?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रागोंदा : साईसेवा मल्टिस्टेट आणि साईसेवा पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारांवरून आधीच संशयाचे वातावरण असताना आता संस्थेच्या कारभाराचा महत्त्वाचा पुरावा असलेली इतिवृत्त पुस्तकेच गायब झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. संस्थेचे संचालक मोहन ज्ञानदेव धगाटे यांनी पदाचा प्रभाव व धाक दाखवून कॅशिअरकडून तिजोरीच्या चाव्या जबरदस्तीने घेतल्या आणि त्यातील महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेऊन लपवून ठेवली किंवा नष्ट केली, असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानंतर श्रीगोंदा पोलिसांनी संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

विशेष म्हणजे, गायब झालेल्या दस्तऐवजांमध्ये २०२० ते जानेवारी २०२६ या कालावधीतील मल्टिस्टेट संस्थेच्या संचालक मंडळाच्या मासिक सभा आणि वार्षिक सर्वसाधारण सभांची इतिवृत्त पुस्तके आहेत. तसेच २०२३ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील साईसेवा पतसंस्थेची इतिवृत्त पुस्तके आणि २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधीतील निवडणूकविषयक कागदपत्रांचाही समावेश आहे.

७० कोटींच्या संशयित कर्जवाटपाच्या चर्चेत नवा पेच!

संस्थेच्या संचालक मंडळाच्या इतिवृत्त पुस्तकांना आर्थिक आणि धोरणात्मक निर्णयांचा अधिकृत आधार मानले जाते. कोणत्या कर्जाला मंजुरी देण्यात आली, कोणते ठराव संमत झाले, निर्णयप्रक्रियेत कोण सहभागी होते, याची माहिती या नोंदींतून मिळू शकते. यापूर्वी संस्थेत सुमारे ७० कोटी रुपयांच्या संशयित कर्जवाटपाबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. अशा परिस्थितीत इतिवृत्त पुस्तकेच गायब झाल्याने आर्थिक व्यवहारांची चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रक्रियेला अडथळा निर्माण होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आठ वर्षीय चिमुरडीच्या हत्या प्रकरणातील अपराधसिद्धी

बेलवंडीचे सहा.पो. नि. सोनवलकर यांचा महासंचालकांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : तपासातील अचूकता, पुराव्यांचे शास्त्रशुद्ध संकलन आणि सांघिक प्रयत्नांच्या जोरावर गंभीर गुन्ह्यात आरोपीला शिक्षा होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांना महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे अहिल्यानगर पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सांगली जिल्ह्यातील आटपाडी पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये दाखल झालेल्या अत्यंत संवेदनशील गुन्ह्यात आठ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने मृतदेह कोरड्या विहिरीत टाकून दिला होता. या प्रकरणाचा तपास करताना भौतिक, न्यायवैद्यकीय आणि दस्तऐवजी पुराव्यांसह

साक्षीदारांच्या साक्षींच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे उभे करण्यात आले.

या तपासाच्या आधारे विटा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने ११ सप्टेंबर २०२६ रोजी आरोपीला फाशी व जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या उल्लेखनीय अपराधसिद्धीची सप्टेंबर महिन्यातील सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

या प्रकरणाच्या तपासात तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक आप्पासाहेब कोळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस हवालदार नंदकुमार पवार, सचिन पाटील, पंकज माने तसेच न्यायालयीन काम काजाची जबाबदारी सांभाळणारे पोलीस शिपाई लक्ष्मण गुरव यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. १३ नोव्हेंबर रोजी पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते या सर्वांचा गौरव करण्यात आला.

सन्मानाचे श्रेय सांघिक कार्याला!

या पुरस्काराबद्दल बोलताना अझख नंदकुमार सोनवलकर म्हणाले, हा सन्मान माझा एकट्याचा नसून तपासात मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी आणि आटपाडी पोलीस ठाण्यातील तत्कालीन अधिकारी व अंमलदार या सर्वांचा आहे. सांघिक प्रयत्नांमुळे आरोपी निष्पन्न करून त्याच्याविरुद्ध भक्कम पुरावे सादर करणे शक्य झाले. हा पुरस्कार भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे.



डॉ. एन. जी. चौधरी यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : येथील प्रतिथयश मधुमेह व हृदयरोग तज्ञ डॉ. नारायण गणपतराव तथा एन. जी. चौधरी (एमडी मेडिसिन) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते.

डॉ. एन.जी. चौधरी यांना शुक्रवारी सकाळी अर्धांग वायूचा त्रास झाला. त्यांना शहरातील मोरगे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. शनिवारी सायंकाळी त्यांची प्रकृती खालावली. रात्री नऊ वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मावलली. वैद्यकीय क्षेत्रातील मार्गदर्शक म्हणून त्यांचा राज्यभर लौकिक होता.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. पुणे येथे कार्यरत आयटी इंजिनियर प्रफुल्ल चौधरी यांचे ते वडील तर शिर्डी येथील विलास शेळके, उपनगराध्यक्ष अभयराजे शेळके, महेंद्र शेळके, ॲड. शिवाजीराव शेळके यांचे ते मेहुणे होत.आज रविवारी दुपारी बारा वाजता श्रीरामपूर येथील अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.


दुष्काळातही महाराष्ट्राच्या पदरी निराशाच!

- दहा वर्षांत मदतीच्या नावाखाली केंद्राची तुटपुंजी मदत
- यंदा २,६९० कोटींचा प्रस्ताव : मात्र केंद्राकडून अद्याप दमडीही नाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण संकट कोसळले असताना केंद्र सरकारच्या मदतीची प्रतीक्षा कायम आहे. राज्य शासनाने तब्बल ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले आहेत. दुष्काळाच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक राज्यात येऊन गेले, तर राज्य सरकारने मदतीपोटी २ हजार ६९० कोटी रुपयांचा प्रस्तावही केंद्राकडे पाठविला आहे. मात्र, अद्याप केंद्राकडून कोणतीही मदत मिळालेली नाही. विशेष म्हणजे, गेल्या दहा वर्षांतील दुष्काळी मदतीचा इतिहास पाहता यंदाही महाराष्ट्राच्या पदरी निराशाच पडणार का, असा सवाल उपस्थित झाला आहे. देशाच्या तिजोरीत सर्वाधिक महसूल देणाऱ्या महाराष्ट्राला संकटाच्या काळात मात्र मदतीसाठी केंद्रापुढे हात पसरावे लागत असल्याने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

अल्-निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात पावसाने दडी मारल्याने शेती आणि शेतकरी संकटात सापडले आहेत. त्यातच अलीकडे आलेल्या चक्रीवादळामुळे मराठवाड्यातील काही भागांतील शेतीचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून सुरुवातीला सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव तयार केला जात असल्याची चर्चा होती. मात्र, प्रत्यक्षात केंद्राकडे २ हजार ६९० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे वृत्त साम टीव्हीने दिले आहे. त्यामुळे राज्याला नेमकी किती मदत मिळणार आणि केंद्र सरकार महाराष्ट्राच्या संकटाकडे किती गांभीर्याने पाहणार, याकडे सर्वांचे



लक्ष लागले आहे.या मुद्द्यावर राज्य सरकारमधील शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनीही केंद्र सरकारकडे अधिक मदतीची मागणी केली आहे. देशातील सर्वाधिक महसूल महाराष्ट्रातून केंद्राला मिळतो. त्यामुळे राज्यावर संकट ओढवते, तेव्हा महाराष्ट्राला अधिक मदत मिळायला हवी, अशी आमची अपेक्षा आहे. मात्र, सर्व राज्यांना धोरणानुसार समान मदत देण्याची भूमिका केंद्र सरकार घेत असेल, तर महाराष्ट्रावर अन्याय होतो. दुष्काळ निवारण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत असले, तरी केंद्रानेही भरीव मदत द्यावी, अशी मागणी शिरसाट यांनी केली आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही केंद्र आणि राज्य सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र देशातील सर्वाधिक जीएसटी वसूल करून देणारे राज्य आहे. कर देताना पहिल्या रांगेत आणि मदत घेताना शेवटच्या रांगेत, हा कुठला न्याय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकीकडे महाराष्ट्राला कृषिप्रधान राज्य म्हटले जाते, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कटोरा घेऊन शेवटच्या रांगेत उभे राहावे लागते, याची राज्यकर्त्यांना लाज वाटत नाही का, असा संतप्त सवालही शेट्टी यांनी केला. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनीही राज्यातील सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे.**(पान ४ वर)**

साखर कारखानदारांनो, ही धोक्याची घंटा ओळखा ! उद्या ऊसच मिळाला नाही तर कारखाने चालवणार कोण ?

संपादकीय

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा केवळ साखर कारखान्यांपुरता मर्यादित नाही. लाखो ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, वाहतूकदार, ट्रॅक्टर मालक, मजूर, व्यापारी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या उद्योगाशी जोडलेली आहे. मात्र आज या संपूर्ण व्यवस्थेसमोर एक गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. तो म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळतो आहे का?साखर कारखानदारांनो, ही धोक्याची घंटा ओळखा! उद्या ऊसच मिळाला नाही तर कारखाने चालवणार कोण?

अशी परिस्थिती निर्माण झाली तर करणार काय हा मोठा प्रश्न आहे

यंदाच्या २०२६-२७ गळीत हंगामात ऊसदर, पहिली उचल, वजनकाट्याची पारदर्शकता, तोडणी व वाहतूक खर्च, उत्पादन खर्च, पाण्याची उपलब्धता आणि वेळेत ऊस बिल न मिळणे अशा अनेक प्रश्नांवर शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे.'जर उसाला चार हजार रुपये प्रतिटन किंवा त्यापेक्षा समाधानकारक मोबदला मिळणार नसेल, तर पुढील वर्षी ऊस लावण्याऐवजी दुसऱ्या पिकांचा विचार करावा लागेल,' अशी भूमिका अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. हा इशारा केवळ ऊसदर वाढविण्याच्या मागणीपुरता मर्यादित नाही. हा भविष्यातील ऊस लागवड क्षेत्र, साखर उत्पादन, कारखान्यांची आर्थिक स्थिती आणि सहकार चळवळीच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्न आहे.

ऊस हे दीर्घ कालावधीचे पीक आहे. साधारण १२ ते १८ महिन्यांपर्यंत शेतकऱ्याला या पिकासाठी मेहनत घ्यावी लागते. जमीन तयार करणे, बेणे, लागवड, खते, औषधे, पाणी, वीज, मजुरी, आंतरमशागत आणि काढणी यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागते. त्यातच अनियमित पाऊस, दुष्काळ, विहिरींची घटणारी पाणीपातळी, सिंचनाचा वाढता खर्च आणि मजुरांची कमतरता या समस्या आहेत.

या सगळ्या अडचणी सहन करून ऊस कारखान्याला दिल्यानंतरही समाधानकारक भाव मिळत नसेल आणि पैशांसाठी वारंवार पाठपुरावा करावा लागत असेल, तर शेतकरी पर्यायी पिकांचा विचार करणारच.कापूस, मका, सोयाबीन, हरभरा, भाजीपाला किंवा स्थानिक परिस्थितीनुसार इतर पिकांकडे वळण्याचा निर्णय शेतकरी घेऊ शकतप्रत्येक पर्यायी पिकात बाजारभावाचा धोका असतो. मात्र शेतकऱ्याला आपल्या जमिनीवर कोणते पीक घ्यायचे, याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे.आजचा ऊसदर हा उद्याच्या ऊस लागवडीचा निर्णय ठरवू शकतो, हे कारखानदारांनी लक्षात घेतले पाहिजे.

कारखानदारांनी एक प्रश्न स्वतःला विचारावा. उद्या शेतकऱ्यांनी ऊस लागवड कमी केली, तर कारखान्यांच्या गाळप क्षमतेचे काय होणार?ऊस उपलब्धता कमी झाली तर त्याचे परिणाम अनेक स्तरांवर जाणवू शकतात.

कारखान्यांना पुरेशा प्रमाणात ऊस मिळणार नाही.

– गाळप क्षमता पूर्ण वापरणे कठीण होऊ शकते.

– साखर उत्पादन कमी होण्याची शक्यता निर्माण होईल.

– कारखान्यांच्या उत्पन्नावर आणि कर्जफेडीच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.– ऊसतोड कामगारांच्या रोजगारावर परिणाम होऊ शकतो.

– ट्रॅक्टर, ट्रक, वाहतूकदार आणि संबंधित व्यावसायिकांचे उत्पन्न कमी होऊ शकते. ग्रामीण बाजारपेठेतील पैशांची उलाढाल मंदावू शकते.सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.म्हणून ऊस लागवड क्षेत्रातील संभाव्य घट हा केवळ कृषी विभागाचा विषय नाही. तो साखर उद्योग, सहकार विभाग, रोजगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विषय आहेमात्र प्रत्यक्ष क्षेत्र घटले आहे, असा निष्कर्ष काढण्यासाठी कृषी विभागाची अधिकृत लागवड आकडेवारी, मागील हंगामातील गाळप आणि चालू हंगामातील तुलनात्मक माहिती आवश्यक आहे.कारखान्याची इमारत ऊस निर्माण करू शकत नाही. ऊस निर्माण करतो तो शेतकरी!

आज शेतकऱ्यांच्या चर्चेत चार हजार रुपये प्रतिटन हा आकडा पुढे येत आहे.या मागणीमागे ऊस उत्पादनाचा खर्च, सिंचन, मजुरी, खते, औषधे, जमिनीचे भाडेमूल्य, भांडवलावरील व्याज आणि वर्षभरापेक्षा अधिक काळ घेतलेली मेहनत हे घटक आहेत. दुसरीकडे कारखानदार साखरेचे बाजारभाव, उत्पादन खर्च, कर्ज, व्याज, इथेनॉल आणि उपपदार्थांच्या उत्पन्नाचे गणित मांडतात.मात्र एक प्रश्न आहे. कारखान्याला आर्थिक अडचणी असतील, तर शेतकऱ्यालाही आर्थिक अडचणी नाहीत काकारखान्याचे कर्ज महत्त्वाचे असेल, तर शेतकऱ्याचे पीककर्ज महत्त्वाचे नाही का?कारखान्याचा उत्पादन खर्च मोजला जात असेल, तर शेतकऱ्याचा उत्पादन खर्च पारदर्शकपणे मोजला जाऊ नये



का?शेतकऱ्याला चार हजार रुपये प्रतिटन किंवा त्यापेक्षा योग्य दर मिळावा, ही मागणी स्वतंत्रपणे चर्चिली पाहिजे. ती लागू *ऋऊझ* समजता कामा नये. *ऋऊझ* हा केंद्र सरकारने हंगामनिहाय निश्चित केलेला कायदेशीर किमान दर आहे.

कायदा शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण कसे करतो?

ऊसदराचा प्रश्न हा केवळ आंदोलनाचा किंवा चर्चेचा विषय नाही. त्याला कायदेशीर आधार आहे.ऊस नियंत्रण आदेश, १९६६ – कलम ३(३)केंद्र सरकारच्या ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील कलम ३(३) नुसार ऊस खरेदी करणाऱ्या साखर कारखान्याने ऊस पुरवठ्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत देय रक्कम अदा करणे अपेक्षित आहे. या तरतुदीतील लेखी करारासंबंधी अपवादही लक्षात घ्यावा लागतो. कलम ३(३-अ) – विलंबित भुगतानावर व्याज१४* दिवसांच्या आत भुगतान न केल्यास विलंबाच्या कालावधीसाठी थकित रकमेवर वार्षिक *१५ टक्के* व्याज देण्याची तरतूद आहे. याशिवाय कलम ३(८) आणि ३(९)* नुसार सक्षम शासन प्राधिकरणाकडून थकीत ऊस बिल आणि व्याजाच्या वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रमाणपत्र पाठविण्याची प्रक्रिया होऊ शकते. त्यानंतर महसुली थकबाकीप्रमाणे वसुली केली जाऊ शकते. म्हणजेच शेतकऱ्याने ऊस दिल्यानंतर त्याच्या पैशासाठी अनिश्चित काळ वाट पाहणे ही सामान्य बाब समजता कामा नये.कारखानदारांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी हा केवळ कच्चा माल पुरवठादार नाही. तो सहकार व्यवस्थेचा महत्त्वाचा भागीदार आहे.

कारखान्याला अडचणी असतील तर त्या शेतकऱ्यांसमोर मांडाव्यात. आर्थिक स्थितीचे पारदर्शक ऑडिट करावे. साखर विक्री, उपपदार्थांचे उत्पन्न, कर्ज, व्याज आणि व्यवस्थापन खर्च यांचे वास्तव शेतकऱ्यांसमोर ठेवावे.कारखाना वाचवायचा असेल तर शेतकऱ्याचा विश्वास जपावा लागेल.शेतकऱ्याला न्याय्य दर, वेळेत भुगतान आणि वजनातील पारदर्शकता दिली, तर तो ऊस लागवड करण्यास प्रोत्साहित होईल. अन्यथा तो आपल्या जमिनीचा आणि उपलब्ध पाण्याचा विचार करून पर्यायी पिकांचा निर्णय घेईल. शेतकरी आणि कारखानदार हे एकमेकांचे विरोधक नाहीत. दोघांचेही हित एकमेकांशी जोडलेले आहे.

कारखान्याला ऊस हवा आहे आणि शेतकऱ्याला योग्य बाजारपेठ व मोबदला हवा आहे.या नात्याला टिकवण्यासाठी पुढील तत्त्वे आवश्यक आहेत, शेतकऱ्याला उत्पादन खर्चाचा विचार करून न्याय्य दर.

कायद्यानुसार वेळेत भुगतान,ऊस वजनाची पारदर्शक व्यवस्था,तोडणी व वाहतूक खर्चाचा योग्य हिशेब,

उपपदार्थांच्या उत्पन्नाचा महसूल वाटपात विचार.

– कारखान्यांच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता.

– शेतकरी प्रतिनिधींचा निर्णयप्रक्रियेत प्रभावी सहभाग. शेतकऱ्याला केवळ ऊस लागवड करा, असे सांगून चालणार नाही. त्याला ऊस लावणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे, याची खात्री देणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल.


कारखाने वाचवायचे असतील तर आधी शेतकरी वाचवा!

आजचा ऊसदर हा उद्याच्या ऊस लागवडीचा निर्णय ठरवू शकतो. आज शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळाला नाही, तर उद्या तो ऊस लागवडीपासून दूर जाऊ शकतो. त्यावेळी कारखान्यांनी ऊस उपलब्धतेसाठी धावपळ केली, तरी शेतकऱ्याचा तुटलेला विश्वास परत मिळवणे सोपे नसेल.कारखानदारांनो, कारखान्याची क्षमता वाढवता येते, यंत्रसामग्री बदलता येते, कर्जाचे पुनर्गठन करता येते; पण शेतकऱ्याच्या मनातून निर्माण झालेली नाराजी दूर करण्यासाठी न्याय्य व्यवहार करावाच लागतो.

शासनानेही कारखान्यांच्या अडचणी समजून घेताना शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाकडे दुर्लक्ष करू नये. शेतकरी जगला तर शेती जगेल. शेती जगली तर ऊस उत्पादन वाढेल. ऊस उत्पादन वाढले तर साखर उद्योग टिकेल आणि साखर उद्योग टिकला तर सहकार चळवळीला बळ मिळेल.कारखानदारांना आजचा ऊस हवा आहे की पुढील वीस वर्षांचा ऊस उत्पादक शेतकरीही हवा आहे?हा प्रश्न प्रत्येक कारखानदार, संचालक, शासन आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्वाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.शेतकऱ्याचा घाम स्वस्त समजू नका. कारण शेतकऱ्याने ऊस लावणे थांबवले, तर कारखान्यांची चाकेही थांबू शकतात!

शब्दांकनकर्ते
नरेंद्र पाटील काळे
प्रदेश उपाध्यक्ष–भारतीय किसान श्रमिक जनशक्ती युनियन महाराष्ट्र राज्य

रेशन दुकानात दिव्यांग बांधवांना लाईनमध्ये उभे न करता प्राधान्य द्या !



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : तालुक्यातील दिव्यांग बांधवांना स्वस्त धान्य दुकानातून रेशन घेताना रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना रेशन वितरणाच्या वेळी प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार खताळ पाटील यांनी पुरवठा अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत संगमनेर तालुक्यातील सर्वच स्वस्त धान्य दुकानांबाहेर दिव्यांगांना रेशन घेताना प्राधान्य देण्याबाबतचे फलक लावण्याच्या सक्त सूचना दिल्या.

दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन घेताना दुकानां मध्ये रांगेत उभे राहावे लागल्याने त्यांना शारीरिक त्रास सहन करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी दिव्यांगांना रेशन वितरणात प्राधान्य मिळावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीवर तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने आमदारांनी पुरवठा अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानाबाहेर दिव्यांगांना रेशन वितरणात प्राधान्य दिले जाईल, असे स्पष्ट करणारे फलक लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.आमदार खताळ पाटील यांनी दिव्यांग बांधवांच्या समस्येची तात्काळ दखल घेतल्याने दिव्यांग सारथी संघटनेच्या सर्वच दिव्यांग बांधवांनी त्यांच्या तत्परतेचे स्वागत केले आहे. या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना रेशन घेताना होणारा त्रास कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दिव्यांगांच्या मानधनात वाढ करण्याची केली मागणी

राज्य सरकारच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दिव्यांग बांधवांना सध्या मिळणारी अडीच हजार रुपयांची रक्कम प्रतिमहिना सहा हजार रुपये करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केली.

दिव्यांग भवन तातडीने सुरू करण्याची मागणी

दिव्यांग बांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती, आवश्यक सुविधा आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, यासाठी दिव्यांग भवन तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणीही संघटनेच्या वतीने करण्यात आली.

राहुरी येथील श्री बालाजी मंदिरात अन्नकोट सोहळा संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राहुरी : येथे असलेल्या श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी ची प्रतिकृती असलेल्या मंदिरात दिवाळी पाडव्यानिमित्त अन्नकोट सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राहुरी शहरात असलेले श्री बालाजी मंदिर अनेक शतकापूर्वीचे पुरातन असून राहुरीचे नगराध्यक्ष कै. लालाशेठ बिहाणी यांच्या संकल्पनेतून मंदिराच्या कायापालट करण्यात आला आहे. जुने वृद्ध या मंदिराची आख्यायिका सांगत असतात हे मंदिर अगदी जागृत देवस्थान असून भक्तांच्या हाकेला धावून येणारे बालाजी भगवान असून अनेक कुटुंबीयांचा उद्धार यांच्या सेवेमुळे झालेला असल्याचे उदाहरण देत असतात.



सदरील मंदिराचा जीर्णोद्धार झाल्यानंतर मंदिराचे संपूर्ण रूप बदलून गेले असून अतिशय भव्य स्वरूपात मंदिराची उभारणी करण्यात आली असून श्री क्षेत्र शिर्डी व शनिशिंगणापूर या देवस्थानच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना नगर मनमाड महामार्गावर असलेल्या या मंदिरात श्री बालाजीचे दर्शन घेण्याची संधी मिळते त्यामुळे दिवसेंदिवस बालाजी मंदिरात भाविक भक्तांची गर्दी वाढत चालली आहे.

दिवाळी पाडव्याचा मुहूर्त साधून या मंदिरात भाविक भक्तांच्या वतीने अन्नकोट सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री बालाजी देवतेच्या मूर्तीला सकाळी अभिषेक करण्यात आला. त्यानंतर दुपारी बारा वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाविक भक्तांनी विशेष करून महिला भक्तांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी झाली होती. मंदिरावर दिवाळी निमित्ताने मंदिरावर मोठ्या प्रमाणात सुंदर अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. व फुलांची सजावट करण्यात आली होती.

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

अहिल्यानगर जिल्ह्यातील काही साखरसम्राटांच्या आणि त्यांच्या भक्त कार्यकर्त्यांच्या काल्पनिक विचारविश्वातील एक उपरोधिक शब्दचित्र!

परवा जिल्हा बँकेचे पदाधिकारी निवडले गेले आणि इकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील साखरसम्राटांनी ऊसदर जाहीर करायला सुरुवात केली. तेही तब्बल ३१००, ३१५०, ३२०० रुपये प्रतिटन! किती मोठी दरवाढ केली म्हणता! आता यापुढे काय मागायचे शेतकऱ्यांनी?

तिकडे कोल्हापूरचे साखर कारखानदार आणि गुजरातमधील गणदेवीचे जयंतीभाई पटेल तब्बल ४७०१ रुपये प्रतिटन ऊसदर देतात. पण त्यांना सामाजिक भानच नाही म्हणायचे! शेतकऱ्यांना एवढे पैसे देण्याची गरजच काय?

जास्त पैसे मिळाले तर शेतकरी व्यसनाधीन होतील, आर्थिक उधळपट्टी करतील, नवीन वाहने खरेदी करतील. २०१० प्रमाणे वाहनांची मागणी वाढली तर वाहनांचा तुटवडा निर्माण होईल. वाहन कंपन्यांना उत्पादन वाढवावे लागेल. उद्योगपतींना एवढा त्रास कशाला द्यायचा?

आपले रस्ते आधीच गर्दीने भरले आहेत. त्यात आणखी वाहने आली तर अपघात वाढतील. अपघात झाले तर दवाखाने आहेतच आपल्या परिसरात! त्यांचाही व्यवसाय चालला पाहिजे की नाही? किती दूरदृष्टीचे विचार आहेत आपल्या नगरच्या साखरसम्राटांचे!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

आमचे अहिल्यानगरचे राजकारणी काय यडे आहेत का? आमदार, खासदार झालेले, एवढे मोठमोठे कारखाने सांभाळणारे साहेब शेतकऱ्यांचे हित कशात आहे हे आम्हाला शिकवणार नाहीत तर कोण शिकवणार? त्यांना समाजाची काळजी आहे, शेतकऱ्यांची काळजी आहे. म्हणूनच ते योग्य दर देतात. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीला सलाम!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!
आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षणाचा!

शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळाले तर ते आपल्या मुलांना मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांत शिक्षणासाठी पाठवतील. मग साहेबांनी आपल्या परिसराच्या विकासासाठी काढलेल्या इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी कॉलेजचे काय होणार? तिथे विद्यार्थ्यांनी शिकायला नको का?

शेतकऱ्यांची मुले बाहेरगावी गेली तर स्थानिक शिक्षणसंस्थांचे नुकसान होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मुलांना बाहेर पाठवता येणार नाही एवढा दरच द्यायचा! परिसराचा विकास आणि साहेबांच्या शिक्षणसंस्थांची भरभराट यांचा किती सुंदर समतोल साधला आहे!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!
आता सामाजिक शांततेचा मुद्दा पाहा.


समाज गरीब असला की त्याला सांभाळणे सोपे असते. दोन-पाच हजार रुपये दिले की अनेक प्रश्न मिटतात. पण समाज श्रीमंत झाला, शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर ते प्रश्न विचारायला लागतात. हक्क केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही, तर लोकशाहीच्या संवर्धनासाठीही आहे!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

आणि हो, भावी पिढी हीच देशाची खरी संपत्ती आहे, हे आम्हालाही मान्य आहे. साहेबांच्या कॉलेजमध्ये शिकणारी काही मुले पुढे भावी साहेबांच्या संपर्कात येतात. त्यातून कार्यकर्ते घडतात. लोकशाही जिवंत ठेवण्याचे महान कार्य हेच कार्यकर्ते करतात. त्यामुळे साहेबांच्या कॉलेजचे योगदान जाते!

कोल्हापूर वाले यडे आहेत

आणि हो, भावी पिढी हीच देशाची खरी संपत्ती आहे, हे आम्हालाही मान्य आहे. साहेबांच्या कॉलेजमध्ये शिकणारी काही मुले पुढे भावी साहेबांच्या संपर्कात येतात. त्यातून कार्यकर्ते घडतात. लोकशाही जिवंत ठेवण्याचे महान कार्य हेच कार्यकर्ते करतात. त्यामुळे साहेबांच्या कॉलेजचे योगदान केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही, तर लोकशाहीच्या संवर्धनासाठीही आहे!



कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!
मग ही शांतता कशी टिकवायची?

श्रीमंत गावची पाटीलकी करण्यापेक्षा ओसाड गावची पाटीलकी करणे कधीही सोपे असते, हे साधे गणित कोल्हापूर-सांगलीवाल्यांना कळत नसावे!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!
आता मद्यपानाचाही विचार करा.

कोल्हापूरवाल्यांना गोवा जवळ आहे. पण आपल्या अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळाले तर ते इंग्लिशने बिंगतील! अर्थात, आपल्या परिसरातील 'बबॉबी भभिंगरी' आणि देशीच्या अर्थव्यवस्थेलाही काही महत्त्व आहे की नाही? शेतकऱ्यांचे रॉकेट इंग्लिशपेक्षा देशीनेच जास्त उंच उडाले तर काय वाईट?

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

आणि आपल्या जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते तर त्याहून मोठे यडे!

ऊसाला ५००० रुपये प्रतिटन मागणारे राजू शेट्टी यांना दुसरे काही कामच नाही. कधी ऊसदरासाठी आंदोलन, कधी हत्तींसाठी संघर्ष, तर कधी शक्तिपीठ महामार्गाला विरोध! कशाला उगाच जिल्ह्यातील शांतता बिघडवायची?

रघुनाथ पाटील तर त्याहून पुढे! ७५०० रुपयांचा कागदावरचा हिशेब घेऊन बसलेले!

या लोकांना काय कळते? आपल्या अहिल्यानगरमध्ये पाहा, सगळे कसे गुण्यागोविंदाने राहतात. कुठलेही आंदोलन फार काळ टिकत नाही. गावोगावी साहेबांचे हितचिंतक आहेत. आंदोलन कसे थांबवायचे, कार्यकर्त्यांना कसे समजावायचे, शेतकऱ्यांना कसे शांत ठेवायचे, याचे उत्तम नियोजन आहे!

शेतकऱ्यांनी प्रश्न विचारू नयेत, संघटित होऊ नये आणि आंदोलन करू नये, यालाच सामाजिक शांतता म्हणायचे असेल तर अहिल्यानगर जिल्ह्याचा खरोखरच आदर्श घ्यायला हवा!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

म्हणूनच आम्ही म्हणतो, ३१००, ३१५०, ३२०० रुपये हाच ऊसदर योग्य आहे!

हा दर केवळ ऊसदर नाही, तर सामाजिक शांतता टिकवण्याचा, शेतकऱ्यांना मर्यादित आर्थिक स्वातंत्र्य देण्याचा, भावी पिढीला स्थानिक शिक्षणसंस्थांशी जोडून ठेवण्याचा, परिसराचा विकास साधण्याचा आणि साहेबांच्या पुढील पिढ्यांच्या राजकीय-सामाजिक भविष्याची काळजी घेण्याचा एक व्यापक कार्यक्रम आहे!

म्हणूनच आम्ही गावोगावचे भक्त शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला जात नाही. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्यापेक्षा साहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहणे आम्हाला अधिक महत्त्वाचे वाटते!

कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

आणि अहिल्यानगरचे दुर्दैव एवढेच की, अजून आमच्या जिल्ह्याला मुख्यमंत्रीपद मिळालेले नाही. नाहीतर जिल्ह्यात जशी सामाजिक शांतता आणि शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती रोखून ठेवण्याची व्यवस्था आहे, तशीच आख्ख्या महाराष्ट्रात केली असती!

कारण खरे राजकारण कसे करायचे, हे शिकायचे असेल तर अहिल्यानगरकडेच पाहायला हवे!

कोल्हापूर-सांगलीवाल्यांनी उगाच शेतकऱ्यांना जास्त पैसे देऊन डोकी फिरवू नयेत. त्यांना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे आहे, पण आम्हाला शेतकऱ्यांना सांभाळायचे आहे!

शेवटी एवढेच...

शेतकरी समृद्ध झाला तर प्रश्न विचारतो, हक्क मागतो आणि अन्यायाविरुद्ध लढतो. त्यामुळे शेतकरी गरीब राहणे हीच काहींच्या दृष्टीने सामाजिक शांततेची खरी गुरुकिल्ली असावी!

आणि म्हणूनच पुन्हा एकदा... कोल्हापूरवाले तर यडेच आहेत...!

जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांच्या काल्पनिक विचारविश्वातील हे उपरोधिक शब्दांकन!

शब्दांकनकर्ते
सुरेश पांडुरंग ताके
जिल्हाध्यक्ष

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

दुष्काळी उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री २२ नोव्हेंबरपासून पुन्हा तालुकानिहाय दौऱ्यावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला यापूर्वी दिलेल्या उपाययोजनांच्या सूचनांची कितपत अंमलबजावणी झाली, याचा आढावा घेण्यासाठी येत्या २२ नोव्हेंबरपासून प्रत्येक तालुक्याचा पुन्हा दौरा करणार असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. प्रवरानगर येथील डॉ. धनंजय गाडगीळ सभागृहात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांची निवेदने स्वीकारून त्यांनी समस्या जाणून घेतल्या. अनेक निवेदनांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विविध गावांतील शिष्टमंडळांशी चर्चा करून स्थानिक प्रश्न समजून घेत सार्वजनिक कामे गांभीर्याने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



जिल्ह्यातील दुष्काळाची गंभीरता लक्षात घेऊन यापूर्वी प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेण्यात आल्या होत्या. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि पाणीपुरवठा योजनांबाबत प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या होत्या. या सूचनांची अंमलबजावणी तपासण्यासाठी पुन्हा तालुकानिहाय दौरे करणार असून, शेतकरी आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधून उर्वरित समस्यांवर उपाययोजना करणे सोयीचे होईल, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीत तातडीने करावयाच्या उपाययोजनांचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. त्यामुळे आवश्यक निधी उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्या मागणीनुसार पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले जात आहेत. पाण्याचे स्रोत असलेल्या ठिकाणी शुद्धीकरण यंत्रणा उभारण्याच्या कामालाही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची पाण्याची मागणी चुकीची नाही. मात्र, जिल्ह्यातील धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचा विचार करून पुढील वर्षाचे नियोजन करण्यात आले आहे. कालवा सल्लागार समितीच्या बैठका झाल्या असून, त्यानुसार जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. उपलब्ध पाण्यातून पिण्याच्या पाण्याची गरज भागवून शेतीसाठीही योग्य नियोजन करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर आवर्तनांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी गावपातळीवरील तलाठी आणि ग्रामसेवकांनी दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. दरम्यान, अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी महसूल आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवावी. ज्या भागात वाळू उपसा सुरू असेल, त्या भागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. दुष्काळी परिस्थितीत प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयोग सुरू आहे. बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राने यापूर्वी या तंत्रज्ञानावर काम केले आहे. कमी खर्चात आणि कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होऊ शकतो. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याचेही विखे पाटील यांनी सांगितले.

द•ख•ल

डॉ. विठ्ठल रहाणे यांच्या पुस्तकाला गिरणा गौरव पुरस्काराने सन्मानित



संगमनेर : गणितातील संकल्पना विद्यार्थ्यांना सहज समजाव्यात आणि गणिताची भीती दूर व्हावी. या उद्देशाने चंदनापुरी येथील डॉ. विठ्ठल रहाणे यांनी २१ पारंपरिक लोकगीत प्रकारांतून साकारलेल्या 'गणित गीतानंद' या पुस्तकाला गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. गणितीय संकल्पनांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (-ख) साहाय्याने आवाज व संगीत देण्यात आले असून, स्वतंत्र वेबसाइट द्वारे डिजिटल स्वरूपातही गीते उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कार्यक्रमात निवडक गीतांचे श्रवण आणि वेबसाइटचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.यावेळी वर्ल्ड कल्चर अँड एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन कमिशन, नवी दिल्लीचे आजीव सदस्य प्रा. डॉ. संजय पवार यांच्या हस्ते डॉ. विठ्ठल रहाणे आणि प्रा. डॉ. नलिनी रहाणे यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री अलका कोठावदे होत्या. सूत्रसंचालन कवी दत्तू दाणी यांनी केले, तर ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन वेळजाळी यांनी आभार मानले.

शिर्डीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था; ग्रामस्थांत तीव्र नाराजी



पुणतांबा : पुणतांबा ते शिर्डी या सुमारे १४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यापैकी पुणतांबा फाट्यापासून पुढील दोन किलोमीटर रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने ग्रामस्थ, वाहनचालक आणि शिर्डीकडे जाणाऱ्या भाविकांना त्रास सहन करावा लागत असून, परिसरातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पुणतांबा आणि शिर्डी ही दोन धार्मिक स्थळे रेल्वे मार्गाने जोडली गेली असली, तरी एका जलद रेल्वेगाडीला पुणतांबा स्थानकावर थांबा नसल्याने या रेल्वे मार्गाचा पुणतांबेकरांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याची भावना आहे. त्यातच रस्त्याचीही दुरवस्था झाल्याने अडचणीत भर पडली आहे. पुणतांबा गावातील अनेक ग्रामस्थ, व्यापारी तसेच नोकरी व व्यवसायानिमित्त दररोज शिर्डीला ये-जा करतात. मात्र खराब रस्त्यामुळे त्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पुणतांबा गावाकडे लोकप्रतिनिधींचे विकासकामांबाबत दुर्लक्ष होत असल्याची नाराजीही व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून डांबरीकरण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

संजीवनीच्या यश नन्नावरेची तैवानमध्ये इंटर्नशीपसाठी निवड



कोपरगाव : संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजचा विद्यार्थी यश संजय नन्नावरे याची तैवानमधील दायेह विद्यापीठात दोन महिन्यांच्या इंटर्नशिपसाठी निवड झाली असुन तो रवानाही झाला आहे. या कालावधीत तो डॉ. सिन-लियांग ओऊ यांच्या मार्गदर्शनाखाली 'सेमिकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग फॉर मेडिकल डिव्हाईस' या विषयावर संशोधन कार्य करणार आहे. ही इंटर्नशिप पूर्णतः प्रायोजित असून, यशच्या प्रवास, निवास आणि भोजनाचा संपूर्ण खर्च दायेह विद्यापीठच करणार आहे. तैवानला इंटर्नशिपला जाणारा यश हा ७६ वा विद्यार्थी ठरला आहे. यशला मिळालेल्या संधीबध्दल संस्थेचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे यांनी त्याचे व पालकांचे अभिनंदन केले. तर संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांच्या हस्ते यश आणि वडील श्री संजय नन्नावरे, आई सौ.उज्वला नन्नावरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डायरेक्टर डॉ. आर. ए. कापगते, डीन ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स डॉ. महेंद्र गवळी, विभागप्रमुख डॉ. माधुरी जावळे उपस्थित होते. संजीवनीच्या इंटरनॅशनल रिलेशन्स विभागामार्फत विध्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये इंटर्नशिप आणि संशोधनाच्या संधी मिळाव्यात, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. यापूर्वीही विध्यार्थ्यांना रशिया, तैवान, कॅनडा, फिलिपाइन्स, ट्युनिशिया, युनायटेड किंगडम इत्यादी ठिकाणच्या नामांकित विद्यापीठांमध्ये दोन ते सहा महिन्यांच्या इंटर्नशिपची संधी मिळाली आहे.

आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याने कोपरगावला आणखी २२ नवीन बस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोळपेवाडी : कोपरगाव बस आगारातील बसची संख्या वाढवून प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. त्यांच्या पाठपुराव्यातून यापूर्वी कोपरगाव आगाराला १० लालपरी आणि १२ जिजाऊ अशा एकूण २२ नवीन बस मिळाल्या असून, आता त्यात आणखी तीन जिजाऊ बसची भर पडली असून शनिवार (दि.२१) रोजी सायंकाळ पर्यंत दोन बस दाखल होणार असून उर्वरित एक बस पुढील आठवड्यात मिळणार आहे. त्यामुळे कोपरगाव आगाराच्या बस ताफ्याची क्षमता वाढणार असून प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. दिवाळीच्या सणानिमित्त सध्या बाहेरगावी जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यातच दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर शाळा-महाविद्यालये सुरू होणार असल्याने ग्रामीण भागातून कोपरगाव शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचीही मोठी वर्दळ राहणार आहे. बसची संख्या अपुरी असल्याने अनेकदा प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागत होती. विशेषतः शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. आता दोन नवीन जिजाऊ बस उपलब्ध झाल्यामुळे गर्दीच्या मार्गांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. कोपरगाव आगारातील बसची अपुरी संख्या लक्षात घेऊन आमदार आशुतोष काळे यांनी नवीन बस उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन मंत्र्यांकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. त्यातून आतापर्यंत २२ नवीन बस मिळाल्या असून, आता आणखी दोन बस उपलब्ध झाल्याने आगाराच्या ताफ्यात एकूण २४ नवीन बसचा समावेश झाला असून पुढील आठवड्यात अजून एक बस आल्यानंतर बसची संख्या २५ वर पोहोचणार आहे. प्रवाशांना नियमित, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर बससेवा मिळावी, यासाठी आगाराला आणखी बस उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांचा अविरतपणे पाठपुरावा सुरू आहे.नवीन बसमुळे महिला प्रवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवाशांची होणारी गैरसोय कमी होऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.त्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीम. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांचे आभार मानले आहे.

एटीएम कार्डची अदलाबदल करून २५ हजार काढून घेतले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील एका एटीएम मध्ये पैसे काढत असताना दोन भामट्यांनी एका शेतकऱ्याला बोल बच्चन करुन एटीएम कार्डची अदला बदल केली. त्यानंतर राहुरी शहरातील एटीएम मधून त्यांच्या कार्डवरुन रोख रक्कम काढून घेतल्याची घटना दि. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. राजेंद्र भाऊसाहेब घाडगे, वय ५० वर्षे, रा. कणगर, ता. राहुरी, यांना शेती कामासाठी पैशांची गरज लागल्याने ते दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजे दरम्यान राहुरी फॅक्टरी येथील एका एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेले. तेव्हा त्यांना पैसे काढताना काहितरी अडचण येत होती. तेव्हा तेथे असलेल्या दोन अज्ञात भामट्यांनी राजेंद्र घाडगे यांना बोल बच्चन करुन त्यांच्या एटीएम कार्डची अदला बदल केली. आणि भामटे तेथून निघून गेले.

त्यानंतर २० मिनीटांनी त्या भामट्यांनी राहुरी शहरातील स्टेट बँक परिसरात असलेल्या एटीएम मधून राजेंद्र घाडगे यांच्या बँक खात्यावरील २५ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतली. सदर घटना एटीएम मधील सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाली. काही वेळाने राजेंद्र घाडगे यांच्या मोबाईलमध्ये पैसे काढल्याचा मेसेज आल्यानंतर सदर घटना त्यांच्या लक्षात आली. घटने नंतर राजेंद्र घाडगे यांचा मुलगा अनिकेत राजेंद्र घाडगे याने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रकार पोलिसांना सांगीतला. तसेच सदर भामट्यांचा शोध घेऊन त्यांचा गजाआड करावे, आणि आमचे पैसे आम्हाला परत करावे, अशी मागणी अनिकेत घाडगे याने केली.

जवाहर विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा ११११ दीप प्रज्वलित करुन दीपोत्सव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

चांदा : नेवासा तालुक्यातील चांदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी संघाच्या वतीने दीपोत्सव- २०२६ या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बलिप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर विद्यालयाच्या प्रांगणात प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून ११११ दीप प्रज्वलित केले व हा दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणून जुन्या आठवणींना उजाळा देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माजी विद्यार्थी संघाचे कार्याध्यक्ष व जिल्हा महाविद्यालयीन कर्मचारी महासंघाचे सचिव संतोष कानडे तसेच माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी यांच्या संकल्पनेतून हा दीपोत्सव साकारण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष किरण जावळे,महाराष्ट्र पत्रकार संघाचे राज्य संपर्क प्रमुख बाबासाहेब राशिनकर, अविनाश चौरे यांनी या वेळी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष देविदास पासलकर, राहुल चौरे, अथर्व चौरे, केतन जावळे, स्वराज राशिनकर, अवधूत शेलार यांच्यासह अनेक मान्यवर व आजी -माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघाचे कार्याध्यक्ष संतोष कानडे यांनी केले व माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी यांच्या सह प्रा. रावसाहेब राशिनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बबलू कापसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

चहावाल्याचा मुलगा झाला डॉक्टर

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत डॉ. मुदस्सर आरिफ शेख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



बेलापूर : येथील जिल्हा भाजप अल्पसंख्यक आघाडीचे उपाध्यक्ष मोहसीन बहोद्दीन सय्यद यांचे भाचे तसेच चहाचा व्यवसाय करणाऱ्याचा मुलगा डॉ. मुदस्सर आरिफ शेख यांनी प्रतिकूलतेवर मात करून जिद्द व परिश्रमा जोरावर यश मिळविता येते हे सिद्ध करून दाखवले आहे. हातगाडीवर चहाचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी कुटुंबातील मुदस्सर यांनी परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून एमबीबीएस डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे शेख कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अस्लम टी हाऊसचे (राहुरी) आरिफ मुनीर शेख यांचे चिरंजीव डॉ. मुदस्सर आरिफ शेख यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाचा प्रवास पूर्ण केला. अस्लम मुनीर शेख आणि आरिफ मुनीर शेख या दोन भावांनी सुरुवातीला हातगाडीवर चहाचा व्यवसाय केला. डॉ. मुदस्सर यांचे प्राथमिक शिक्षण राहुरी येथील विद्यामंदिर प्रशालेत झाले. त्यानंतर वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांना जॉर्जिया येथे पाठविण्यात आले. तेथे एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून ते भारतात परतले. भारतात वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या पात्रता परीक्षेतही त्यांनी यश संपादन केले. त्यामुळे त्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाला पूर्णत्व मिळाले आहे.

डॉ. मुदस्सर हे मरहूम मुनीरभाई शेख यांचे नातू होत. मरहूम मुनीरभाई यांनीही अत्यंत परिश्रमपूर्वक आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करून मुलांना घडविण्यात मोलाचे योगदान दिले. घरची परिस्थिती आणि आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवून मुदस्सर यांनी शिक्षणात सातत्य राखले. डॉ. मुदस्सर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाजातील सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्रीरामपूरच्या कॅनॉलमध्ये कचऱ्याचे साम्राज्य; आ. सत्यजित तांबे यांनी केली पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : श्रीरामपूर शहरातील कॅनॉल परिसरात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्याने परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. काही नागरिक घरातील जुन्या गाद्या, इतर टाकाऊ साहित्य तसेच कचरा थेट कॅनॉलमध्ये आणून टाकत आहेत. तसेच संध्याकाळच्या वेळी रस्त्यालगत लागणाऱ्या हातगाड्यांमधून निर्माण होणारा कचराही कॅनॉल परिसरात टाकला जात असल्याने अस्वच्छतेत भर पडत आहे. या गंभीर प्रकाराची आ. सत्यजित तांबे यांनी प्रत्यक्ष कॅनॉल परिसरात जाऊन पाहणी केली. यावेळी परिसरातील कचऱ्याची समस्या, नागरिकांकडून होणारी अस्वच्छता आणि स्वच्छतेच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी अशोक मगर, राजू पठाडे, विजय शिंपी, गोपाल जोशी, किशोर परदेशी, दत्तात्रय जाधव राजेंद्र पवार योगेश गायकवाड भारत राऊत बाळासाहेब वाघ आदी उपस्थित होते.

कॅनॉल परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. घरातील कचरा, जुन्या गाद्या तसेच हातगाड्यांवरील कचरा कॅनॉलमध्ये न टाकता त्याची योग्य विल्हेवाट लावावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नगरपालिका प्रशासनानेही या ठिकाणी नियमित स्वच्छता व कचरा टाकणाऱ्यांवर योग्य कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणासाठी एक डिसेंबरला शासनाविरुद्ध महामोर्चाची हाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : धनगर समाजाचा आरक्षणाचा शेवटचा लढा लढण्यासाठी अहिल्यानगरच्या गावागावातील समाज बांधवांना लाखोंच्या संख्येने १ डिसेंबर च्या महामोर्चात घराघरातील समाजबांधवांच्या खांद्याला खांदा लावत महिला मुले आणि विद्यार्थ्यांसहित हजेरी लावावी व समाजाची ताकद शासनाला दाखवावी अशी हाक धनगर समाजाचे आरक्षण आंदोलनाचे नेते दिपकभाऊ बोऱ्हाडे यांनी दिली.

आतापर्यंत समाजाने विविध ठिकाणी आंदोलन केले. यामधून समाजाचे आरक्षण प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता असताना समाजात फूट पाडण्यासाठी काही पक्षातील लोक आंदोलन हाणून पाडण्याचे प्रयत्न करतात त्यातून समाजातील संघटन शक्ती मजबूत करण्यासाठी आज गावोगाव फिरून मी स्वतः समाज बांधवांच्या सुख दुःखात सहभागी होऊन त्या समजावून घेत समाजातील सर्व घटकांशी एकरूप होण्याचा संकल्प केला यातून समाजाची खरी ताकद दाखविण्याची वेळ आता आली असून मी समाजाच्या बळावर मोठा आहे आणि समाज माझी ताकद आहे. त्यामुळे आरक्षण मिळण्यासाठी सर्वात माझे प्रतिबिंब पाहून या लढ्यात उतरण्याची तयारी घरातील प्रत्येकाने ठेवा अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली समाजातील युवकांनी भाजपा ला सत्तेसाठी सर्वात मोठी भूमिका बजावली मुंबई आणि दिल्लीच्या सत्तेत जाण्यासाठी समाजाचे मोठे योगदान भाजपच्या पाठीशी समाजाने उभे केले आणि पहिल्याच दिवशी कॅबिनेट मध्ये आरक्षणाची घोषणा करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन हवेत विरले की काय असे वातावरण सध्या दिसत आहे.

समाजाचे बळावर सत्तेत असताना समाजाची आरक्षण घोषणेचे काय झाले हा जबाब विचारणे साठी आरक्षण आंदोलनात प्रत्येक समाजबांधवानी सहभागी होणे गरजेचे हे आज दीड वर्ष आपल्या हातात आहे दिल्लीत मोदी सरकार आणि मुंबईत फडणवीस सरकार असे आहेत तोपर्यंत आपल्याला आरक्षण मिळणे शक्य आहे. त्यानंतर सरकार येऊनही आपला उपयोग नाही याची जाणीव समाजाने ठेवावी त्यामुळे या निर्णायक लढ्यात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व शासनाला आणण्याचे काम करावे असे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले.



यावेळी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी येथील उपसरपंच कोंडीराम विटनोर हे होते. यावेळी मल्हारयोद्धा दिपक बोऱ्हाडे यांचे गावात आगमन होताच येळकोट येळकोट जय मल्हार आरक्षण आमचे हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा देण्यात आले. त्यानंतर मिरवणुकीने डीजे च्या भव्य मिरवणूकीने त्यांना येथील पेठेतून मिरवणूक काढून ग्रामदैवत चंद्रगिरी महाराज मंदिरात दर्शन घेतल्यानंतर फटाक्यांच्या आतषबाजीने त्यांचे येथील अहिल्यादेवी होळकर स्मारकाजवळ आगमन झाले त्यानंतर येथे आरती होऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी येथील अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, विविध संस्थेचे पदाधिकारी तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रवीण विटनोर यांनी मानले.

संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : जगप्रसिद्ध श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे भाविक, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघातांचा धोका अधिकच वाढला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाचा निषेध करण्यासाठी चक्क रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनासाठी राज्यभरातून हजारो भाविक व पर्यटक नेवासा येथे येत असतात. मात्र मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याने भाविकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, त्यामध्ये पावसाचे पाणी साचले आहे. त्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. वाहनांचे अपघात होऊन काही नागरिक जखमीही झाले आहेत. याचा त्रास स्थानिक नागरिकांसह शाळकरी विद्यार्थी आणि बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांनाही सहन करावा लागत आहे.

या गंभीर समस्येकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यावरील खड्डे बुजवावेत व रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिक आणि भाविकांकडून होत आहे. प्रशासनाने याबाबत त्वरित कार्यवाही न केल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला यावेळी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रस्त्यावरील खड्ड्यात ज्येष्ठ नेते शंकरराव लोखंडे नगरसेवक स्वप्निल मापारी, जालिंदर गवळी, सामाजिक कार्यकर्ते अक्षय टेकाळे, दिलीप जाधव, ज्ञानेश्वर जाधव, अण्णा जाधव, प्रवीण कोरेकर, अक्षय पंडुरे, प्रकाश जाधव, संतोष गवळी, तुषार काळे यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

या अनोख्या निषेध आंदोलनातून प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.याप्रसंगी नगरसेवक स्वप्निल मापारी, जालिंदर गवळी, सामाजिक कार्यकर्ते अक्षय टेकाळे, दिलीप जाधव, ज्ञानेश्वर जाधव, अण्णा जाधव, प्रवीण कोरेकर, अक्षय पंडुरे, प्रकाश जाधव, संतोष गवळी, तुषार काळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

पान १ वरुन

दुष्काळातही महाराष्ट्राच्या पदरी निराशाच!

एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा पवार यांनी अमित शहा यांची भेट घेण्याऐवजी महाराष्ट्रातील दुष्काळासाठी जास्तीत जास्त मदत मिळावी, यासाठी केंद्राकडे आग्रह धरायला हवा, अशी टीका त्यांनी केली. राज्याच्या तिजोरीत पैसे नसून केंद्राच्या मेहरबानीवर राज्य चालविण्याची वेळ आली आहे. दुष्काळ निवारणासाठी ४५ हजार कोटी रुपयांची गरज असताना ४ हजार कोटी रुपयेही उपलब्ध होत नसल्याचा आरोप राऊत यांनी केला. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेल्या दुष्काळी मदतीचा गेल्या दहा वर्षांतील तपशीलही धक्कादायक आहे. २०१४-१५ मध्ये राज्याने ६ हजार १३ कोटी रुपयांची मागणी केली असताना केंद्राने १ हजार ९६२ कोटी रुपये दिले. २०१५-१६ मध्ये ६ हजार २० कोटींच्या मागणीपोटी ३ हजार ६३९ कोटी रुपये मिळाले. २०१७-१८ मध्ये ओखी चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ३ हजार ३७३ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती; मात्र केंद्राकडून अवघे ६०.७५ कोटी रुपये देण्यात आले. २०१८-१९ मध्ये ७ हजार ९०२.७७ कोटी रुपयांची मागणी असताना ४ हजार ७१४.२८ कोटी रुपये मिळाले. विशेष म्हणजे, २०२३-२४ मध्ये २ हजार ६९०.३२ कोटी रुपयांची मागणी करूनही केंद्राकडून एक रुपयाचीही मदत मिळाली नसल्याचे वृत्त आहे. राज्याच्या आपत्ती प्रतिसाद निधीत (एसडीआरएफ) पुरेसा निधी उपलब्ध असल्याचे कारण देत ही मदत नाकारण्यात आली होती. तर २०१९-२०, २०२२-२३ आणि २०२४-२६ या कालावधीतील मदतीच्या मागणीचा तपशील माहिती अधिकारातून मागविण्यात आला; मात्र संबंधित माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचे साम टीव्हीच्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे. एकूणच, महाराष्ट्र देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देत असताना नैसर्गिक आपत्तीच्या काळात राज्याला अपेक्षित मदत मिळत नसल्याची भावना आता तीव्र होत आहे. दुष्काळाची झळ सोसणारा शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असताना केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वयाचा अभावही चर्चेचा विषय बनला आहे. केंद्राचे पाहणी पथक येऊन गेले, मदतीचा प्रस्तावही पाठविला गेला; पण प्रत्यक्ष मदत कधी मिळणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. त्यामुळे यंदाच्या दुष्काळात केंद्र सरकार महाराष्ट्राला दिलासा देणार की पुन्हा एकदा आश्वासनांवरच बोळवण करणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

पाकिस्तानच्या जबड्यातून विजय हिसकावला!

परिस्थितीत मनल चव्हाण आणि मोहित उल्वा यांनी पाकिस्तानच्या गोलंदाजांचा नेटाने सामना करीत ५७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. मनलने ४७ धावांची झुंजार खेळी करीत भारताला विजयाच्या उंबरठ्यावर आणले. मात्र, तो बाद झाल्यानंतर भारताची नववी विकेट पडली आणि सामना पुन्हा पाकिस्तानच्या बाजूने झुकल्याचे चित्र निर्माण झाले. पराभव जवळ आलेला असताना न डगमगता विजय खेचून आणण्याची जिद्द, शेवटच्या क्षणापर्यंत लढण्याची वृत्ती आणि मोहित उल्वाची झंझावाती खेळी, या जोरावर भारताने पाकिस्तानला धूळ चारली. या ऐतिहासिक विजयासह भारतीय युवा संघाने नवव्यांदा आशिया चषक जिंकण्याचा पराक्रम केला. भारत-पाकिस्तान क्रिकेटमधील या रोमहर्षक विजयाची चर्चा आता क्रिकेटप्रेमींमध्ये रंगणार असून युवा भारतीय संघाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

पठारे हत्याकांडाला नवे वळण; अटक तरुणांच्या कुटुंबीयांचे पोलिसांना निवेदन

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या रोहित पठारे हत्याकांडातील सर्व २६ आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक केलेल्यांमध्ये एका अल्पवयीन आरोपीचाही समावेश आहे. सर्व आरोपी पोलिसांच्या ताब्यात आल्याने आता या गुन्ह्यातील नेमकी भूमिका, घटनाक्रम आणि पुराव्यांच्या आधारे तपासाला निर्णायक वळण मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : रोहित पठारे हत्याकांडानंतर शहरात निर्माण झालेला तणाव अद्याप कायम असतानाच या प्रकरणातील दुसऱ्या बाजूनेही आक्रमक भूमिका घेतली आहे. अटक करण्यात आलेल्या तरुणांच्या कुटुंबातील महिलांनी शनिवारी (ता. १४) उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय गाठून निवेदन सादर केले. एकाच बाजूचा विचार न करता दोन्ही बाजूंच्या तक्रारी, घटनाक्रम आणि पुरावे तपासून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.



विशेषतः १६ नोव्हेंबर रोजी रोहित पठारे समर्थकांकडून मोर्चा काढण्याचे नियोजन असल्याने महिलांनी सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याच दिवशी अटक केलेल्या तरुणांना न्यायालयात हजर केले जाणार आहे. यापूर्वी पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आपल्या मुलांवर हल्ला झाल्याचा आरोप महिलांनी केला. अशा परिस्थितीत न्यायालयात हजर करताना किंवा मोर्चादरम्यान पुन्हा काही अनुचित प्रकार घडल्यास जबाबदारी कोणाची राहणार, असा सवाल त्यांनी केला. संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी मोर्चा रद्द करावा किंवा आरोपींना न्यायालयात हजर करण्याची तारीख बदलावी, अशी मागणीही करण्यात आली.

महिलांनी दिलेल्या निवेदनानुसार, ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास येवला रोड आणि जीवनश्री वसाहत परिसरात काही तरुणांना मारहाण झाली होती. त्यानंतर सायंकाळी साडेपाचच्या सुमारास येवला रोडवरील हॉटेलसमोर पुन्हा मारहाणीची घटना घडली. या घटनांवरून दोन्ही गटांनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या होत्या. त्याच रात्री आठच्या सुमारास रोहित पठारे याला मारहाण झाली. उपचारादरम्यान ३ नोव्हेंबरला त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात २६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहितच्या मृत्यूपूर्वी झालेल्या मारहाणीच्या प्रकरणातही संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी महिलांची मागणी आहे. तसेच घटनास्थळी उपस्थित नसलेल्या १३ ते १४ तरुणांची नावे हत्येच्या गुन्ह्यात समाविष्ट केल्याचा आरोप त्यांनी केला. कोयता, कत्ती आणि लोखंडी रॉडसारख्या शस्त्रांनी आपल्या मुलांवर हल्ला झाल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे.

व्हिडिओंच्या तपासाची मागणी

सोशल मीडियावर रोहित पठारे याच्या हातात कोयता असल्याचे आणि त्याने काही तरुणांना मारहाण केल्याचे व्हिडिओ प्रसारित झाले आहेत. या व्हिडिओंची सत्यता तपासून संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करावा, तसेच रोहितविरुद्ध यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी महिलांनी केली. एका विशिष्ट समाजातील तरुणांना लक्ष्य करून दोन समाजांत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली. शहरातील शांतता कायम राखण्यासाठी कोणत्याही बाजूच्या दबावाला बळी न पडता सर्व तक्रारी आणि पुराव्यांची निष्पक्ष चौकशी करावी. जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी भूमिका महिलांनी निवेदनातून मांडली आहे.

सह्याद्रीच्या साक्षीने भरणार पर्यावरण संवर्धनाचा राज्यव्यापी जागर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : सह्याद्रीच्या हिरव्यागार पर्वतरांगा, निसर्गसंपन्न भंडारदऱ्याचे रमणीय वातावरण आणि पर्यावरण संवर्धनाचा व्यापक ध्यास... अशा प्रेरणादायी पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील निसर्गप्रेमी, पर्यावरण अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि पर्यावरण क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्था एकाच व्यासपीठावर एकत्र येणार आहेत. निसर्ग संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार व रविवार, दि. १४ व १५ नोव्हेंबर २०२६ रोजी इकोसिटी, घाटघर, भंडारदरा, ता. अकोले येथे दहाव्या राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.



मंडळाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रमोद (दादा) मोरे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणारे हे संमेलन केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवी दिशा, नवी ऊर्जा आणि राज्यव्यापी व्यापकता देणारे व्यासपीठ ठरणार आहे. सह्याद्रीच्या निसर्गरम्य कुशीत पर्यावरणाच्या प्रश्नांवर चिंतन, अभ्यास, अनुभवांची देवाणघेवाण आणि प्रत्यक्ष कृतीचा संकल्प या संमेलनातून केला जाणार आहे. या संमेलनाला ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री राहिबाई पोपेरे राहणार असून उद्घाटनप्रसंगी लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते उपस्थित राहणार आहेत. याशिवाय मंत्रालय, मुंबई येथील विशेष कार्य अधिकारी चंद्रकांत आडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी चंद्रकांत शिंदे, पुणे महानगरपालिकेचे अधीक्षक अभियंता नामदेव गिंभिरे, कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, सीएसआर प्रमुख संतोष जगधने यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करा : आ. प्राजक्त तनपुरेंचे निर्देश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील आरडगाव परिसरात सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याचे काम अद्याप काही भागांत अपूर्ण असल्याने शेतकर्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून संबंधित शेतकर्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू करावा, असे स्पष्ट निर्देश आमदार प्राजक्त तनपुरे यांनी महावितरणच्या अधिकार्यांना दिले. या प्रश्नासंदर्भात आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयात संबंधित ग्रामस्थ व अधिकार्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी अपूर्ण कामांचा आढावा घेऊन आवश्यक लोखंडी पोल व कंडक्टर तातडीने उपलब्ध करून देण्याचे आदेश त्यांनी अधिकार्यांना दिले.

आरडगाव उपकेंद्रातून निघणार्या ३३/११ के.व्ही. सिंगल फेज शेती वीजवाहिनीद्वारे आरडगाव, मानोरी, गणपतवाडी, वळण, शिलेगाव, चंडकापूर, केंदळ बुद्रुक, केंदळ खुर्द व मुसळवाडी या गावांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, आरडगाव येथील काळे वस्ती, खुरुद वस्ती, म्हसे वस्ती, इंगळे वस्ती, वने वस्ती, झुगे वस्ती, आढाव वस्ती आणि देशमुख वस्ती या परिसरांतील सुमारे १२

ट्रान्सफॉर्मर अद्याप सौर ऊर्जा प्रकल्पाच्या दिवसा वीजपुरवठ्याशी जोडले गेलेले नाहीत. त्यामुळे या भागातील शेतकर्यांना योजनेचा लाभ मिळण्यास अडथळा निर्माण झाला आहे. शेतकर्यांची गैरसोय लक्षात घेऊन प्रलंबित कामे विनाविलंब पूर्ण करावीत. आवश्यक साहित्याची उपलब्धता करून देत वीजपुरवठा तातडीने कार्यान्वित करावा, अशा सूचना आमदार तनपुरे यांनी यावेळी दिल्या. या बैठकीस डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक सुनील मोरे, सोसायटीचे चेअरमन जालिंदर काळे, सतीश म्हसे, अरुण वने, विजय म्हसे, आदिनाथ ढेरे, उत्तम वने, गणेश झुगे, हेमंत वने, अशोक म्हसे यांच्यासह आरडगाव परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

बाबुर्डीच्या क्षितिज ठुबे यांची एनडीएत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



निघोज : पारनेर तालुक्यातील बाबुर्डी येथील क्षितिज सतीश ठुबे यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) एनडीए-१५७ कोर्ससाठी झालेल्या निवड प्रक्रियेत ऑल इंडिया रँक ३१० मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अलाहाबाद येथे झालेल्या एसएसबी मुलाखतीच्या कठीण टप्प्यात यशस्वी कामगिरी करत त्यांनी आपल्या जिद्दीची, चिकाटीची आणि मेहनतीची चुणूक दाखवून दिली आहे. त्यांच्या या यशामुळे बाबुर्डी गावासह संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. क्षितिज यांचे आजोबा लक्ष्मण तबाजी ठुबे यांनी भारतीय सैन्यदलात सेवा बजावली असून ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर त्यांनी पुणे महानगरपालिकेतही काम केले. आजोबांकडून मिळालेला देशसेवेचा वारसा नातू क्षितिज पुढे नेत असल्याने ठुबे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे. क्षितिज यांनी कोंढवा येथील यशोतेज अकॅडमीमध्ये बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या या यशस्वी वाटचालीत तेजस पाटील, विकास पाटील, प्रथमेश घाटगे आणि ओंकार धारकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित संरक्षण प्रशिक्षण संस्थेपर्यंत मजल मारल्याने युवकांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. क्षितिज यांच्या या यशाबद्दल लोणी मावळा येथील सेवानिवृत्त रयत सेवक प्रभाकर लाळगे, विश्वनाथ लाळगे, संभाजी राऊत, शिवाजी लाळगे, बाबाजी लाळगे, सोन्याबापू लाळगे,डॉ. सोपान शेंडकर आदींनी अभिनंदन केले.

निधन वार्ता

कमरुनिसा सय्यद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : सोनई जवळील (प्रशांत नगर) येथील रहिवासी कमरूनिसा पीरमहंमद सय्यद वय ८६ यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. दोस्ती इलेक्ट्रॉनिकचे संचालक शफिक सय्यद यांच्या त्या मातोश्री होत.

चंदाबाई पांडे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : महावीर नाष्टा सेंटरचे मालक राजेंद्र पांडे व गणेश पांडे यांच्या मातोश्री, विकास पांडे यांच्या आजी चंदाबाई देवीलालजी पांडे (वय -७५) यांचे दि.१४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दिर, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

गं.भा.सुनिता मुठे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : प्रगतशील शेतकरी व केमिस्ट अविनाश मुठे यांच्या मातोश्री, माणिकराव गोविंदराव मुठे यांच्या भावजयी, ह.भ.प.रविंद्र महाराज मुठे, दत्तात्रय, राहुल व सागर मुठे यांच्या चुलती गं.भा.सुनिता अशोकराव मुठे (वय-७२) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दिर, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

कचरू चोथवे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : सेवानिवृत्त पीएसआय कचरू दत्तात्रय चोथवे (वय -६४) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर नगरपरिषदचे कॉन्ट्रॅक्टर शुभम चोथवे व गणेश चोथवे यांचे ते वडील होत.

महिलांचा सन्मान हीच दिवाळीची खरी भेट : आ. संग्राम जगताप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि आपुलकीचा सण आहे. या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. कुटुंब आणि समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान मोठे असून, त्यांचा सन्मान करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून त्यांचा सन्मान करण्याचा साई श्रद्धा फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. साई श्रद्धा फाउंडेशनच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीनिमित्त महिलांसाठी साडीवाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार जगताप यांच्या हस्ते महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. फाउंडेशनच्या अध्यक्षा अर्चना चंद्रकांत परकाळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जगताप म्हणाले की, महिला कुटुंबासाठी दिवसरात्र मेहनत घेत असतात. त्यांच्या कार्याचा सन्मान होणे आवश्यक आहे. दिवाळीच्या आनंदात गरजू आणि सर्वसामान्य महिलांना सहभागी करून घेण्याचा फाउंडेशनचा प्रयत्न सामाजिक बांधिलकी जपणारा आहे. फाउंडेशनच्या सचिव आर्किटेक्ट श्रद्धा परकाळे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. महिलांचे सक्षमीकरण, त्यांचा सन्मान आणि समाजातील विविध घटकांसाठी फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षा अर्चना परकाळे म्हणाल्या की, महिलांना दिलेली साडी ही केवळ वस्तुरूप भेट नसून त्यांच्या सन्मानाची आणि आपुलकीची भावना आहे. दिवाळीचा आनंद सर्वांसोबत वाटून घेणे हाच या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमास श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, विराज टाक, फाउंडेशनचे पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते. महिलांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राज्यमार्गालगत कृषी गोदाम फोडले; सव्वा लाखाचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

भोकर : श्रीरामपूर-नेवासा राज्यमार्गावरील खोकर फाट्याजवळ असलेल्या कृषी गोदामाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी सुमारे एक लाख १५ हजार २०० रुपयांचा ऐवज लंपास केला. शुक्रवारी (दि.१४) मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. राज्यमार्गालगतच चोरी झाल्याने परिसरातील व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

भोकर शिवारातील गट क्रमांक २३७ मध्ये तुकाराम कांबळे यांच्या मालकीचे 'मौनगिरी ॲग्रो' नावाचे कृषी साहित्याचे गोदाम आहे. चोरट्यांनी गोदामाच्या शटरचा कोयंडा तोडून शटर एका बाजूने उचकटले. त्यानंतर महिंद्रा कंपनीच्या ९००९ वाणाच्या प्रत्येकी २० किलो वजनाच्या गव्हाच्या २४ गोण्या (किंमत ४३ हजार २०० रुपये), थायर कंपनीच्या ५० मिलीच्या ४० बाटल्या (किंमत ४२ हजार रुपये) आणि इम्पीड कंपनीच्या १५० मिलीच्या ४० बाटल्या (किंमत ३० हजार रुपये) असा एकूण एक लाख १५ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

विशेष म्हणजे, कांबळे कुटुंबाच्या मालमत्तेवर चोरीची ही तिसरी घटना आहे. एप्रिल २०२३ मध्ये त्यांच्या घराचा दरवाजा तोडून रोकड चोरीला गेली होती. त्यानंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये खोकर फाटा येथील दुकानाचा मागील पत्रा उचकटून चोरी करण्यात आली होती. या पूर्वीच्या घटनांचा तपास अद्याप लागलेला नसतानाच पुन्हा गोदाम फोडण्यात आल्याने चोरट्यांचे धाडस वाढल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या घटनेबाबत रात्री उशिरापर्यंत तालुका पोलिसांत गुन्हा दाखल झाला नव्हता.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

रविवार, दि.१५ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त	सिंगल ५-१-९ मजबुत		जोड
१७९ २७८ ३७७	८ - २	१५० २४० ६००	७०-४६-३१ २५-६९

कल्याण

उदय-अस्त	सिंगल ९-४-५ मजबुत		जोड
१४५ २३५ ५५०	६ - ३	१२० ६७० ३००	०७-१३-२६- ८९-३४

मुंबैम (मेन)

उदय-अस्त	सिंगल ४-७-९ मजबुत		जोड
१५६ १२९ ११०	१ - १	१३० १४९ ११२	२०-८४-५१- ७९-४३


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
७७९	१६७
३४	४६
४५५	११४

मढीत पोहोचले वांबोरी चारीचे पाणी! कृती समितीच्या संघर्षाला मोठे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

करंजी : गेल्या दोन महिन्यांपासून वांबोरी चारीचे पाणी लाभक्षेत्रातील ३९ गावांमधील तलावांमध्ये सोडण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र, अनेक गावांपर्यंत पाणी पोहोचत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. विशेषतः योजनेच्या शेवटच्या टोकाला असलेल्या गावांना पाण्यापासून वंचित राहावे लागत होते. अखेर वांबोरी चारी कृती समितीने यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, शनिवारी सायंकाळी सहा वाजता वांबोरी चारीचे पाणी मढी येथील तलावात पोहोचले. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेल्या अनेक वर्षांपासून वांबोरी चारीच्या पाणी वितरणाचा प्रश्न कायम आहे. काही गावांमध्ये पाणी पोहोचते, तर काही गावांमध्ये पाणी पोहोचत नाही. अनेक ठिकाणी पाइपलाइनमध्ये तांत्रिक अडचणी व पाण्याच्या प्रवाहातील तुटवड्यामुळे शेवटच्या टोकावरील गावांना पाणी मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण होत होती. यंदा दुष्काळी परिस्थिती असल्याने पाथर्डी तालुक्यातील डोंगराळ भागातील गावांना पाणीटंचाईचा तीव्र सामना करावा लागत आहे.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरणाऱ्या वांबोरी चारीचे पाणी मिळावे, यासाठी शेतकरी सुरुवातीपासून प्रयत्नशील होते. मात्र, वारंवार मागणी करूनही अपेक्षित यश मिळत नव्हते. या पार्श्वभूमीवर मढी येथे लाभक्षेत्रातील गावांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत वांबोरी चारीचे पाणी मिळवण्यासाठी संघटितपणे संघर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर वांबोरी चारी कृती समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या माध्यमातून तिसगाव येथे आंदोलनही करण्यात आले.

त्यानंतर कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अभियंता, उपअभियंता तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन पाणी वितरणाबाबत ठोस भूमिका मांडली. पाणी सोडताना 'टेल टू हेड' पद्धतीचा अवलंब करावा, म्हणजेच चारीच्या शेवटच्या टोकावरील गावांना प्रथम पाणी मिळेल आणि त्यानंतर इतर गावांकडे पाणी वळवता येईल, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावर अधिकाऱ्यांनी पाणी मिळण्याबाबत सकारात्मक ग्वाही दिली होती. अखेर शनिवारी सायंकाळी सहा वाजता मढी येथील तलावात वांबोरी चारीचे पाणी दाखल झाले. यावेळी कृती समितीचे सदस्य व वांबोरी चारी पाइपलाइनचे कर्मचारी उपस्थित होते. पाणी मढीत पोहोचताच कृती समितीच्या सदस्यांनी कर्मचाऱ्यांचा सत्कार करून आनंद व्यक्त केला.

द•ख•ल

घरफोडीत साडेतीन लाखांचा ऐवज लांबवला!

अहिल्यानगर : शहरातील पाईपलाईन रोडवरील नामांकित बायजाबाई सोसायटीत दिवसभरात घडलेल्या एका खळबळजनक घरफोडीच्या घटनेने परिसरात मोठी सनसनाटी पसरली असून नागरिक हादरले आहेत. याबाबत मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, फिर्यादी बाळासाहेब रेवजी पवार हे आपल्या खाजगी कामासाठी घराचे मुख्य दरवाजाला कुलूप लावून जिल्हा सहकारी बँकेत गेले होते आणि त्यांची पत्नी व मुले निंबोडी येथे नातेवाईकांकडे गेले होते. दुपारच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा फायदा घेऊन दरवाजाचे कुलूप कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि बेडरूममधील लोखंडी कपाटाचे लॉकर तोडले. चोरट्यांनी कपाटातून तब्बल पंचेचाळीस ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि सात हजार रुपयांची रोकड असा एकूण एक लाख सत्तावन्न हजाराचा ऐवज चोरून नेला. याच चोरट्यांनी फिर्यादी यांच्या घरामागे राहणारे शेजारी अमोल सूर्यकांत झेंडे यांच्याही बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि चोरीचा प्रताप सुरू ठेवला. अमोल झेंडे यांच्या घरातून पंचेचाळीस ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, विविध सोन्याच्या अंगठ्या आणि त्रेपन्न हजार रुपयांची रोकड असा एकूण एक लाख ब्याऐंशी हजाराचा ऐवज लांबवण्यात आला. अशा प्रकारे दोन्ही घरांत मिळून अज्ञात चोरट्यांनी एकूण तीन लाखो एकोणतीस हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकडवर डल्ला मारला आहे. सायंकाळी फिर्यादी घरी परतले असता त्यांना घराचा दरवाजा उघडा व कुलूप तुटलेले दिसल्याने त्यांनी तातडीने तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन यासंदर्भात फिर्याद दाखल केली. घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि फॉरेन्सिक युनिटला बोलावून घेऊन घटनास्थळावरून तांत्रिक पुरावे व फिंगरप्रिंट गोळा केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक कल्पना चव्हाण आणि महिला पोलीस हवालदार गायकवाड पुढील कसून तपास करत आहेत.

भिंगारमध्ये घरात घुसून मारहाण आणि विनयभंग; योगेश चव्हाण विरोधात गुन्हा दाखल

अहिल्यानगर : भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत शाहुमहाराज कॉलनी, भिंगार टेकडी येथे घरात घुसून एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण केल्याची आणि विनयभंग केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्रीच्या सुमारास फिर्यादी महिला तिच्या आई-वडिलांच्या घरी असताना आरोपी योगेश प्रकाश चव्हाण हा तिथे आला. आरोपीने घराचा दरवाजा वाजवून बळकावून घरात प्रवेश केला. त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या वडिलांच्या डोळ्यावर हाताने मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता आरोपीने फिर्यादीच्या आईला लाथ मारून त्यांची छाती दाबून लज्जा उत्पन्न होईल असे अयोग्य वर्तन केले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आरोपीने फिर्यादी महिलेला लाकडी काठीने जबर मारहाण केली आणि अश्लील शिवीगाळ केली. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी देऊन लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५७७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ११८ (१), ३५१ (२) (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

घरगुती वादातून तरुणावर लोखंडी हत्याराने प्राणघातक हल्ला; सात जणांवर गुन्हा दाखल

अहिल्यानगर : लालटाकी परिसरातील मिसगर चाळ येथे पूर्वमानसिक व घरगुती वादातून झालेल्या तुफान हाणामारीत एका तरुणाला लोखंडी फायटर व हत्याराने मारहाण करत गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सात नामजद आरोपींसह अन्य काही जणांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा सर्व प्रकार ९ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणातील फिर्यादी मुबीन मोहम्मद वसीम शेख हे आपल्या घराजवळ असताना हा प्रकार घडला. फिर्यादीच्या कुटुंबातील एका महिलेस सुरू असलेल्या वादात मारहाण होऊ नये म्हणून फिर्यादी बीचमध्ये आले होते. याचाच राग मनात धरून आरोपींनी एकत्र येऊन हा हल्ला केला. या प्रकरणी फिर्यादी मुबीन मोहम्मद वसीम शेख यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या या अर्जावरून पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींची नावे पोलिसांनी निष्पन्न केली आहेत. त्यात शेख शहानवाज सुलतान उर्फ शन्नो, शेख युसुफ सुलतान उर्फ बाबा, शेख इरफान युसुफ, शेख अबरार युसुफ, शेख सुलतान युसुफ आणि शेख सना शहनवाज अशी सर्व आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी मिसगर चाळ, लालटाकी येथीलच रहिवासी असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या मुख्य सात आरोपींव्यतिरिक्त इतर दोन ते तीन अनोळखी इसम देखील या गुन्ह्यात सहभागी होते. आरोपींनी एकत्र जमून कायदेशीर नियम डावलून बेकायदेशीर मंडळी जमवली होती. हातामध्ये लोखंडी फायटर व लोखंडी हत्यारे घेऊन त्यांनी हा भयानक हल्ला केला. हल्ल्यादरम्यान फिर्यादीच्या नाकावर, कपाळावर, कानाभोवती व तोंडातील दातास जबर दुखापत करण्यात आली. मारहाण करताना आरोपींनी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देखील दिली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल विलास सीताराम लोणारे हे करत आहेत.

सावेडीत कुलूप तोडून घरात चोरी; अडीच तोळ्यांचे मंगळसूत्र, रोख रक्कम व मोटारसायकल लांबवली

अहिल्यानगर : शहरातील सावेडी भागातील ऐक्य नगर येथील भारत गॅस गोदामाजवळ राहणारे ज्येष्ठ नागरिक तथा वकील मधुसदन पांडुरंग गात यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना घडली आहे. दिवाळी सणाच्या सुटीनिमित्त फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय सावंतवाडी येथे बाहेरगावी गेले असल्याची संधी साधून चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास बंद घराचे कुलूप तोडले. घराच्या मुख्य दरवाजाचे व गेटचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला आणि घरातील साहित्याची फेरफार करून बेडरूममधील साहित्य अस्ताव्यस्त केले. घरातील कपाटात व सुटकेसमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केली असून यामध्ये सोन्याचे मंगळसूत्र व कानातील झुबे चोरीस गेले आहेत. तसेच घराच्या कंपाऊंडमध्ये लावलेली हिरो कंपनीची काळ्या रंगाची मोटारसायकल देखील अज्ञात चोरट्यांनी पळवून नेल्याचे निष्पन्न झाले आहे. शेजाऱ्यांनी घराचे कुलूप तुटलेले व मोटारसायकल गायब असल्याचे पाहून फिर्यादीच्या मुलाला फोन करून या घटनेची तातडीने माहिती दिली. माहिती मिळताच फिर्यादीच्या मुलाने मित्राच्या मार्फत डायल ११२ वर फोन करून पोलिसांना या चोरीबाबत अधिकृतपणे माहिती कळवली. घटनेची माहिती समजताच पोलीस कर्मचारी व डॉग स्क्वॉड पथकाने घटनास्थळी धाव घेऊन कसून पाहणी व पंचनामा केला आहे. फिर्यादी मधुसदन पांडुरंग गात यांच्या फिर्यादीवरून सावेडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणेकडून गांभीर्याने केला जात आहे.

२४ वर्षांनंतर गुरु-शिष्यांचा स्नेहमेळावा

९५ माजी विद्यार्थ्यांसह १५ शिक्षकांची उपस्थिती; शाळेला ११ पंख्यांची भेट!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



बेलवंडी : तब्बल २४ वर्षांचा दुरावा संपवत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, बेलवंडी येथील माजी विद्यार्थी आणि शिक्षक पुन्हा एकदा एकत्र आले. जुन्या आठवणी, बालपणीच्या गमतीजमती आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या आठवणींनी हा स्नेहमेळावा भावनिक वातावरणात रंगला. शुक्रवारी झालेल्या या मेळाव्यात ९५ माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींसह १५ शिक्षकांची उपस्थिती होती.

एकेकाळी याच वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी तब्बल २४ वर्षांनंतर शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवत जुन्या आठवणींना उजाळा दिला. मधल्या सुट्ट्यांमधील मस्ती, वर्गातील गंमतीजमती, शिक्षकांचा धाक आणि त्यांनी दिलेले संस्कार यांची आठवण सांगताना अनेकांचे मन गहिवरून आले. एकमेकांच्या आयुष्यातील बदल, यश आणि संघर्ष जाणून घेत जुन्या मैत्रीला पुन्हा उजाळा मिळाला.

ज्या शाळेने आपल्याला शिक्षण, संस्कार आणि जीवनाची दिशा दिली, त्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला ११ नवीन पंखे भेट दिले. केवळ आठवणींमध्ये रमण्याऐवजी शाळेसाठी काहीतरी योगदान देण्याच्या त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

या विद्यालयातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज अभियांत्रिकी, सिव्हिल इंजिनिअरिंग, चार्टर्ड अकाउंटन्सी, पोलीस दल, शासकीय सेवा, संगणक क्षेत्र, कृषी उद्योग, व्यवसाय, आधुनिक शेती आणि ब्युटी पार्लर अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण केलेले हे विद्यार्थी पुन्हा एकाच व्यासपीठावर आल्याने मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आपल्या यशामागे शाळेने दिलेले शिक्षण, संस्कार आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी उपस्थित गुरुजनांचा सन्मान करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांची प्रगती आणि त्यांचे यश पाहून शिक्षकांनीही समाधान व्यक्त केले. २४ वर्षांनंतर झालेली ही भेट केवळ स्नेहमेळावा न ठरता गुरु-शिष्यांच्या अतूट नात्याचा आणि जुन्या मैत्रीचा सुंदर सोहळा ठरली. भविष्यातही नियमितपणे एकत्र येण्याबरोबरच शाळेच्या विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प करत या संस्मरणीय मेळाव्याची सांगता झाली.

हक्काच्या पाण्यासाठी वरुरमध्ये 'विठाई कृषी जलसिंचन अभियान एम-५'चा शुभारंभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : शेवगाव तालुक्यातील वरुर (धाकटी पंढरी) येथे पांडूरंग कृषी विज्ञान मंडळाच्या वतीने शेतकऱ्यांना हक्काचे व निर्धारित शेतीपाणी मिळवून देण्यासाठी 'विठाई कृषी जलसिंचन अभियान एम-५'चा शुभारंभ करण्यात आला. ग्रामीण भागात शेतीपाण्याच्या प्रश्नांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी तालुक्यातील पहिले स्वतंत्र शेतकरी कार्यालयही सुरू करण्यात आले.

मंडळाचे अध्यक्ष माणिकराव म्हस्के यांनी प्रास्ताविकात अभियानाची भूमिका स्पष्ट केली. सुधारित वरुर-आखेगावसह १३ गावांच्या ताजनापूर जलसिंचन योजना टप्पा-१ चा पाठपुरावा, मुळा पाटबंधारे विभागांतर्गत वरुरच्या सुमारे एक हजार हेक्टर क्षेत्राला गेल्या ३० वर्षांपासून वंचित असलेले हक्काचे पाणी मिळवून देणे, नाणी नदीवरील अतिवृष्टीमुळे फुटलेले बंधारे दुरुस्त करणे तसेच अपूर्ण खोलीकरण व रुंदीकरणाची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे, ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे त्यांनी सांगितले.

शेती आणि शेतकरी कल्याणासाठी मंडळाने २०२६ ते २०३१ असा पाच वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. दीपावली पाडव्याच्या मुहूर्तावर माजी पंचायत समिती सभापती शोभाताई वावरे यांच्या हस्ते फीत कापून व श्रीफळ वाढवून अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भानुदास अथरगन होते. यावेळी मंगलताई म्हस्के, मीनाताई खैरे, अशोक खांबट, नानासाहेब वावरे, अभियंता श्रीधर म्हस्के यांच्यासह सरपंच सचिन म्हस्के, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. वरुर बुद्रुक व वरुर खुर्दच्या हक्काच्या पाण्यासाठी पक्षीय व गटातटाचे राजकारण बाजूला ठेवून सर्वांना सोबत घेऊन समिती स्थापन केल्याचे माणिकराव म्हस्के यांनी सांगितले.

घोगरगावात गुटख्याचा काळाबाजार! दोन ठिकाणी एलसीबीचे छापे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

१५ हजारांचा प्रतिबंधित माल जप्त

श्रीगोंदा : तालुक्यात प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखूची विक्री खुलेआम सुरू असल्याचे पुन्हा समोर आले आहे. घोगरगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेने एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून तब्बल १५ हजार ३४८ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त केला. नाथ हॉटेल आणि निसार शेख यांच्या पानटपरीवर झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील गुटखा विक्रीचे जाळे पुन्हा चर्चेत आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १.५७ वाजता घोगरगाव येथील नाथ हॉटेलवर छापा टाकला. यावेळी दादासाहेब मारुती शिंदे (वय ४१, रा. घोगरगाव) याच्याकडे विक्रीसाठी ठेवलेला ५ हजार १८२ रुपयांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व विमल पानमसाला आढळून आला. या प्रकरणात लल्लू गायकवाड (रा. रुईखेल, ता. श्रीगोंदा) याचाही आरोपी म्हणून समावेश असून तो फरार आहे.

यानंतर अवघ्या काही मिनिटांत दुपारी २.०८ वाजता घोगरगाव येथील निसार मुसा शेख (वय ४१) यांच्या पानटपरीवर दुसरी कारवाई करण्यात आली. तेथे १० हजार १६६ रुपयांचा विमल पानमसाला आणि प्रतिबंधित तंबाखूचा साठा आढळून आला.

या प्रकरणात राजू शेख (पूर्ण नाव माहीत नाही, रा. कडा, ता. आष्टी, जि. बीड) याचाही आरोपी म्हणून समावेश असून तो फरार आहे. दोन्ही प्रकरणांत नमूद आरोपींना गुन्हा दाखल होताना अटक झालेली नव्हती.

आव्हाड महाविद्यालयाच्या चार संशोधन प्रकल्पांची विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या चार संशोधन प्रकल्पांची आविष्कार स्पर्धेत विद्यापीठ स्तरावरील सादरीकरणासाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस वाव मिळावा, विद्यार्थ्यांमधून उद्योजक व संशोधक निर्माण व्हावेत, विद्यापीठातील सायन्स व इनोव्हेशन पार्क, इन्क्यूबेशन सेंटर व -डझखठए सारख्या संशोधनपर प्रोत्साहन योजनांशी विद्यार्थी जोडले जावेत या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करते.

ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर पदवी, व संशोधन पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी , शिक्षकांसाठी नैसर्गिक शास्त्रे, वैद्यकीय व औषध निर्माणशास्त्र, कृषी व पशुपालन, वाणिज्य व्यवस्थापन व कायदा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि मानव्यविद्या या सहा विद्याशाखांत घेतली जाते. या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालय, जिल्हा व विद्यापीठ स्तरावर केले जाते.

त्यापैकी वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा या विभागातून महाविद्यालयाने दोन संशोधन प्रकल्प पाठविले होते. ते दोन्हीही विद्यापीठ स्तरावरील सादरीकरणासाठी निवडले गेले. यामध्ये कशिश तांबोळी, सिद्धी धस , यांचा न नालिटिकल स्टडी ऑफ इम्पॅक्ट ऑफ डिजिटल मार्केटिंग ऑन बिझनेस ग्रोथ, व अश्विनी शिरसाट, भाग्यश्री गाडे यांचा उत्पन्न स्थिर, महागाई गतिमान: मजुरांच्या जीवनाचा संघर्ष या दोन संशोधन प्रकल्पांचा समावेश आहे. शामल भाबड, कांचन मीरपगार, यांचा स्मार्ट इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टीम हा संशोधन प्रकल्प वैद्यकीय व औषध निर्माणशास्त्र या विभागातून तर शाहिद पठाण व समीर शेख यांचा वेटसेतू: युवर डिजिटल ब्रिज टू व्हेटर्नरी केअर हा संशोधन प्रकल्प कृषी व पशुपालन या विभागातून विद्यापीठ स्तरावरील सादरीकरणासाठी निवडला गेला. या यशासाठी अभय आव्हाड, ॲड. सुरेश आव्हाड, डॉ. बबन चौरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या प्रकल्पासाठी महाविद्यालयाचे शैक्षणिक व संशोधन समन्वयक प्रा. डॉ. अभिमन्यू ढोरमारे, प्रा. डॉ. विजयकुमार म्हस्के, प्रा. डॉ. प्रशांत साळवे, प्रा. सारिका लाडे, प्रा. दिपाली चिलवंत आणि प्रा. अमोल गोसावी यांनी मार्गदर्शन केले.

खा. लंके यांचा स्नेहमेळावा अन् माजी मंत्री थोरात यांची उपस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : खा. निलेश लंके यांनी ऐन दिवाळीत हंगा या त्यांच्या गावी स्नेहमेळाव्याचे आयोजन करुन जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विजयी झाल्याचा मोठा आनंद साजरा केला. हा स्नेहमेळावा दरवर्षी होत असला तरी यावर्षीच्या या मेळाव्याला ऐक वेगळाच विषय चर्चीला गेला आहे. थोरात आणी विखे पाटील यांची सहमती एक्स्प्रेस जिल्हा सहकारी बँकेत धावत असली तरी थोरात आणी विखे यांचे मनोमिलन फक्त सहकारापुरते मर्यादित झाले असेच म्हणावे लागेल. खासदार लंके आणी विखे पाटील यांचे राजकीय वैर सगळ्यांनाच माहीत आहे. मात्र जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक सुरू झाली आणी विखे थोरात एकत्र आले. लंके यांना पारनेरची एकमेव जागा देऊन निवडणूक बिनविरोध होईल असाच कयास सगळ्यांना जाणवत होता मात्र लंके नकोत या भुमिकेवर विखे पाटील ठाम राहिल्याने फक्त ११ जागा बिनविरोध होत १० जागांसाठी निवडणूक झाली. खासदार लंके यांनी जवळपास सर्वच जागांवर उमेदवार देऊन निवडणूक लढण्याचा प्रयत्न केला मात्र पारनेरची जागा ते मोठ्या मताधिक्याने जिंकले आणी हम भी कुछ नही असा संदेश त्यांनी राज्यात दिला. खासदार लंके यांनी नांगर घेऊनच जिल्हा बँकेत जाणार अशी घोषना केल्याने वातावरण गरमागरम झाले. मात्र खासदार लंके हे बँकेत गेले रजिस्टरवर सही करीत त्यांनी विनम्रपणे मानधन नाकारले आणी हंगा येथील स्नेहमेळाव्यात उपस्थित राहीले. या मेळाव्याला माजी मंत्री आणी राज्याचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आवर्जून उपस्थिती दाखवून खासदार लंके यांचे भरभरून कौतुक केले. याचा अर्थ थोरात हे सहकारात जरी विखे पाटील यांच्या बरोबर असले तरी विरोधी आघाडी म्हणून ते लंके यांच्या बरोबर असल्याचे अधोरेखित झाले आहे. लंके यांनी जिल्हा बँकेत निवडून आल्यानंतर थोरात हे आपले नेते आहेत हे जाहिरच केले होते. तसेच खासदार लंके हे सुद्धा लगेच संगमनेरला जाऊन त्यांनी थोरात यांचा सत्कार स्विकारत आशीर्वाद घेतला. याचा अर्थ हे राजकारण म्हणावे तसे सरळ नाही. लंके हे पारनेरकरांना जसे हवेसे आहेत तसेच जिल्हा राजकारणात सुद्धा त्यांनी उभारी घ्यावी अशी इच्छा थोरात तसेच ईतर राजकीय नेत्यांना आहेच. खासदार लंके यांना पाठबळ देण्याचे काम भाजपचे काही नेते करीत आहेत. हे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत दिसून आले आहे. अशाप्रकारे विखे विरुद्ध लंके या राजकीय सारीपाटात यापुढे विखे विरोधक लंके यांना पाठबळ देतील हे स्पष्ट झाले असून यापुढे होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत खासदार लंके हे विरोधकांची कशाप्रकारे मोट बांधतात हेच पाहाणे महत्त्वाचे ठरणार असून विखे पाटील लंके यांचा राजकीय संघर्ष टोकाचा राहणार हेच यातून स्पष्ट होत आहे.

शेवगावातील रखडलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत संताप

गाडगे बाबा चौक ते क्रांती चौक रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : शेवगाव शहरातून जाणाऱ्या तिसगाव-पैठण मार्गावरील गाडगे बाबा चौक ते क्रांती चौक या रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्याचे काम बंद असल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून व्यापारी, वाहनचालक, पादचारी आणि स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, विश्व हिंदू परिषद कार्यालय ते गाडगे बाबा चौक या दरम्यानच्या दुभाजकाचे कामही अद्याप अपूर्ण असल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या दोन्ही रखडलेल्या कामांना तातडीने सुरुवात करून ती पूर्ण करण्याची मागणी सर्व पक्षीय कार्यकर्ते यांच्या वतीने प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संबंधित विभागाने त्वरित कार्यवाही न केल्यास बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ रोजी आंबेडकर चौक, शेवगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी आणि सुरक्षिततेशी संबंधित या प्रश्नाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन रस्त्याचे व दुभाजकाचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रसंगी हर्षदाताई काकडे,हरिष भारदे,अशितोष डहाळे,अमर पुरनाळे, रोहित काथवटे, सुनिल काकडे, प्यारेलाल शेख ,जाकिर कुरेशी, प्रवीण भास्कर, कैलास तिजोरे आदी उपस्थित होते.

१८ नोव्हेंबरला रास्ता रोकोचा इशारा



दखल

दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे लहान मुलांसाठी मोफत हृदय शस्त्रक्रिया अभियान

पुणे : गणेश कुंभकर्ण : पुण्याचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या 'जय गणेश रुग्णसेवा अभियाना'अंतर्गत लहान मुलांसाठी हृदयावरील मोफत शस्त्रक्रिया अभियान राबविण्यात येणार आहे. हे विशेष अभियान १४ ते २४ नोव्हेंबर दरम्यान पार पडणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

शहरातील इनलॅक्स बुधरानी हॉस्पिटल (कोरेगाव पार्क) आणि लोकमान्य हॉस्पिटल (सेनापती बापट रोड) यांच्या सहकार्याने हे अभियान राबविले जाणार आहे. गरजू रुग्णांना या मोफत सुविधेचा लाभ घेण्यासाठी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी ट्रस्टच्या गणपती भवन कार्यालयातून (२५०, बुधवार पेठ, बेलबाग चौकाजवळ) रीतसर पत्र घेणे आवश्यक आहे.या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांनी रेशन कार्ड, आधार कार्ड किंवा उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील अधिक माहितीसाठी नागरिकांनी सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ट्रस्टच्या कार्यालयाशी ०२०-२४४७९२२२ किंवा ०२०-२४४३०५२७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या संपूर्ण अभियानाचे नियोजन व व्यवस्थापन सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र परदेशी आणि त्यांचे सहकारी करत आहेत. गोरगरीब आणि गरजू रुग्णांच्या मुलांसाठी हे अभियान एक मोठा आधार ठरणार असून, जास्तीत जास्त गरजूंनी याचा लाभ घ्यावा, अशी विनंती ट्रस्टतर्फे करण्यात आली आहे.

फुलगावच्या श्री शनैश्वर मंदिरात हजारो पणत्यांनी दीपोत्सव



आळंदी : दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून फुलगाव येथील श्री शनैश्वर मंदिरात शिवसेना आळंदी शहरप्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या वतीने भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारो पणत्या प्रज्वलित केल्याने मंदिर परिसर प्रकाशाने उजळून निघाला. भक्तिमय वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडला.श्री शनैश्वर महाराजांच्या चरणी दीपप्रज्वलन करून शेतकऱ्यांवरील संकटे दूर होऊन सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी व आरोग्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी उपशहरप्रमुख विशाल पंडित तापकीर, ज्ञानेश्वर घुंडरे, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शामतात्या कोळपकर, सुयश कदम, हिरामण तळेकर, स्वराज चव्हाण, पृथ्वीराज गावडे, संतोष शेवाळे, शांभवी चव्हाण यांच्यासह शिवसैनिक व भाविक उपस्थित होते.

आळंदी नगरपरिषदेसमोर रिक्षाचालकावर खंजीराने वार

आळंदी : पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तीन जणांनी एका तरुण रिक्षाचालकावर खंजीराने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १३) सकाळी साडेदहाच्या सुमारास आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आळंदी नगरपरिषदेच्या समोरील पीसीएमटी चौकात घडली. या हल्ल्यात सागर दत्तात्रय बडे (वय २२, रा. अण्णाभाऊ साठे नगर, काटे कॉलनी, देहू फाटा, दिघी) हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन जण हातात धारदार शस्त्रे घेऊन सागर बडे याचा पाठलाग करीत होते. यावेळी आर्यन नागोराव पंडित (रा.कोळगाव) आणि त्याच्या अन्य दोन साथीदारांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून सागर याच्यावर खंजीराने वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. भरवस्तीत, भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे पीसीएमटी चौक परिसरात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी धारदार शस्त्रांचा वापर करून हल्ले होण्याच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

ग्रामपंचायत सदस्यपदाच्या वादातून एकाच कुटुंबातील तिघांना मारहाण !

कवठे येमाई : ग्रामपंचायतीतील सदस्यपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळावरून निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. शिरूर ग्रामीण येथील पाषाण मळा परिसरात एकाच कुटुंबातील तिघांना लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजता घडली.

याप्रकरणी सचिन भाऊसाहेब घावटे,प्रथमेश धनंजय घावटे व ऋषिकेश शेलार या तिघांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सासवडमध्ये उभे राहिले 'शरद-विजय'!

यशवंतरावांचा वसा, पवारांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : 'राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य द्या,' हा महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी दिलेला मंत्र आमच्या कामाचा पाया आहे. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली याच वाटेवर चालत आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानने संस्थेला कायमस्वरूपी आर्थिक बळ देणारे 'शरद-विजय' व्यापारी संकुल उभे केले आहे, असे प्रतिपादन प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

सासवड-पिसर्वे रस्त्यावर उभारलेल्या या संकुलात ३० गाळे असून, त्यासाठी सुमारे ४ कोटी रुपये खर्च आला आहे. प्रतिष्ठानचे खजिनदार सीए सत्येन नवलाखा यांच्या हस्ते संकुलाचे 'शरद-विजय' असे नामकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोलते होते, तर उद्योजक व विश्वस्त भाऊसाहेब शिंगाडे, सासवडचे माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, माजी अधीक्षक अभियंता रमेश आगवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य द्या, हा यशवंतराव चव्हाण यांचा मंत्र आमच्या कामाचा पाया आहे. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली याच वाटेवर चालत प्रतिष्ठानला कायमस्वरूपी आर्थिक बळ देणारे संकुल आम्ही उभे केले.'
– विजय कोलते, अध्यक्ष, आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान

परिसरात दुष्काळी परिस्थिती असल्याने कोणताही गाजावाजा न करता अत्यंत साधेपणाने हा सोहळा पार पडला. प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी प्रास्ताविकातून संकुलाच्या उभारणीचा प्रवास मांडला, तर बंडूकाका जगताप आणि ॲड. अण्णासाहेब खाडे यांनी मनोगत व्यक्त करत प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. या वेळी ॲड. कला फडतरे, रमेश कोतवाल, शशिकला कोलते,



सासवड येथे आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या 'शरद-विजय' व्यापारी संकुलाच्या नामकरण फलकाचे अनावरण करताना प्रतिष्ठानचे खजिनदार सीए सत्येन नवलाखा. समवेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, विश्वस्त भाऊसाहेब शिंगाडे, माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, माजी अधीक्षक अभियंता रमेश आगवणे, सचिव शांताराम पोमण, बंडूकाका जगताप, ॲड. अण्णासाहेब खाडे, शशिकला कोलते आदी मान्यवर.

नंदूकाका जगताप, माऊली मेमाणे, प्राचार्य संदीप टिळेकर, संजय मुथा, रामचंद्र खेडेकर, डॉ. राजेश दळवी, ॲड. अशपाक बागवान यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन घोलप यांनी केले, तर प्रतिष्ठानचे सहसचिव गौरव कोलते यांनी आभार मानले.

ज्ञानेश्वरीचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक : आ.बाबाजी काळे

आळंदीत 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींची ज्ञानेश्वरी हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून संपूर्ण मानवजातीला जीवन जगण्याची दिशा देणारा अमूल्य ठेवा आहे. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान, विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' परिवाराने हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांतून माउलींचे विचार घराघरांत पोहोचतील, असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी, आळंदी देवाची आणि 'ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' पुस्तक प्रकाशन व सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



ज्ञानेश्वरीमध्ये जीवनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आणि मार्गदर्शन माणसाला योग्य मार्ग दाखविण्याची ताकद आहे. संत ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या विचारांतून समाजाला समता, बंधुता, मानवता आणि सदाचाराचा संदेश दिला आहे. हा विचार केवळ ग्रंथापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येकाच्या आचरणात उतरला पाहिजे. विशेषतः आजच्या तरुण पिढीला संत साहित्याची ओळख करून देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही काळे यांनी नमूद केले.

या सोहळ्याला डॉ.नारायण महाराज जाधव, आळंदी देवस्थानचे विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पुरुषोत्तम पाटील, प्रकाश काळे, ज्ञानेश्वर वीर, अजित वडगावकर, वसंत लोंढे, तुकाराम गवारी, सुभाष गेठे, उमेश बागडे, श्रीधर घुंडरे, प्राजक्ता हरपळे, विलास वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ज्ञानेश्वरीच्या प्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध संस्था, प्राचार्य आणि अध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

झेंडेवाडी शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

जुन्या आठवणींना उजाळा; शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

दिवे : (झेंडेवाडी ता. पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकवृंद आणि शाळा व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्व माजी विद्यार्थ्यांचे औक्षण करून आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सहशिक्षिका मीना कांबळे यांनी मेळाव्याच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत उपस्थितांचे स्वागत केले. प्रभारी मुख्याध्यापिका मंजुषा शेंडकर यांनी शाळेतील उपलब्ध भौतिक सुविधा तसेच भविष्यातील विकास योजनांची माहिती



प्रास्ताविकातून दिली. यावेळी झेंडेवाडीचे सरपंच अमरदादा झेंडे, पोलीस पाटील सारिकाताई झेंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर झेंडे, उपाध्यक्ष मनीषाताई झेंडे, शितलताई झेंडे यांच्यासह माजी विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. मेळाव्यात उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील बालपणीच्या आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील विविध प्रसंगांना उजाळा दिला. केवळ स्नेहसंमेलनापुरता मर्यादित न राहता शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी सरपंच अमरदादा झेंडे यांनी शाळेच्या विकासासाठी विशेष पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळेतील बाग, परसबाग, ठिबक सिंचन व्यवस्था, पेव्हिंग ब्लॉक, संरक्षक गेट आदी कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितल्या स्नेहमेळाव्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळण्याबरोबरच शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले. सहशिक्षिका साधना गवळी यांनी आभार मानले..

जिल्ह्यात 'नंबर वन', आता लक्ष्य राज्यात झेंडा!

गुरोळी पुन्हा मैदानात; 'समृद्ध पंचायतराज'साठी ग्रामस्थ एकवटले

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

सासवड : पुणे जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावून ५० लाख रुपयांच्या पुरस्काराचा 'गुलाल' उधळणाऱ्या पुरंदर तालुक्यातील गुरोळी गावाने आता थेट राज्यस्तरावर मोहोर उमटवण्याचा चंग बांधला आहे. ग्राम विकास विभागाच्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२६-२७'साठी गावाने कंबर कसली असून, त्याची रणनीती ठरवण्यासाठी नुकतीच ग्रामस्थांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत राज्य शासनाच्या शासन निर्णयाचे जाहीर वाचन करण्यात आले आणि अभियानाचा हेतू, नियम, गुणांकनाचे निकष व स्पर्धेची रचना यांची इत्थंभूत माहिती ग्रामस्थांसमोर मांडण्यात आली. उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर यांनी शासन निर्णयातील प्रत्येक तरतुदीचा अर्थ सोप्या भाषेत उलगडून दाखवत, गावाने कोणत्या दिशेने आणि कशा पद्धतीने काम करायला हवे, याचा आराखडाच ग्रामस्थांपुढे ठेवला. हे



गुरोळी (ता. पुरंदर) : 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२६-२७' संदर्भातील शासन निर्णयाचे वाचन करून ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर; समवेत ग्रामस्थ.

अभियान केवळ ग्रामपंचायतीच्या दप्तरापुरते मर्यादित नसून प्रत्येक घराचा सक्रिय सहभाग ही त्याची खरी कसोटी आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले. लोकसहभागातून उभी राहणारी विकासकामे, स्वच्छता, पर्यावरण रक्षण, जलसंधारण, हरित गाव संकल्पना, पारदर्शक व सक्षम कारभार, महिला सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या मुद्द्यांवर गावाचे गुणांकन ठरणार आहे. गावकऱ्यांसाठी ही स्पर्धा केवळ बक्षिसापुरती नसून सर्वांगीण प्रगतीचा राजमार्ग असल्याची भावना बैठकीत व्यक्त झाली. महिला, युवक, शेतकरी, बचत गट, सामाजिक संस्था आणि ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांनी खांद्याला खांदा लावून काम करावे, असे आवाहन खेडेकर यांनी केले. गावाचा विकास ही एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची मक्तेदारी नसून तो सामूहिक संकल्प असतो; प्रत्येकाने आपली जबाबदारी पेलली तर गुरोळीचे

"हे अभियान केवळ ग्राम पंचायतीच्या कागदपत्रांपुरते मर्यादित नाही, तर गावातील प्रत्येक घराचा सक्रिय सहभाग हीच त्याची खरी कसोटी आहे. महिला, युवक, शेतकरी, बचत गट आणि सामाजिक संस्थांनी एकदिलाने काम केल्यास गुरोळीचे नाव राज्याच्या नकाशावर नक्कीच झळकेल."
– प्रशांत खेडेकर, उपजिल्हाधिकारी

नाव राज्याच्या नकाशावर ठळकपणे झळकेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. गेल्या वेळच्या घवघवीत यशाने गावाचा आत्मविश्वास दुणावला असून, यंदा अधिक नियोजनबद्ध आणि जोमदार तयारीने उतरण्याचा एकमुखी निर्धार ग्रामस्थांनी केला. 'एक गाव, एक ध्येय, एकजूट' या घोषवाक्याने बैठकीचा समारोप झाला.

टाकळी हाजी पोलीस चौकीत शेतकऱ्याला मारहाण केल्याचा उपनिरीक्षकावर आरोप

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

कवठे येमाई : शिरुरच्या बेट भागातील टाकळी हाजी पोलीस चौकीत चौकशीसाठी बोलावून एका शेतकऱ्याला मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप पोलीस एका उपनिरीक्षकावर करण्यात आला आहे.या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.टाकळी हाजी येथील रावसाहेब सुखदेव घोडे (वय ३४) यांनी याबाबत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार ३१ ऑक्टोबर रोजी शेतीच्या वादातून त्यांच्या चुलतभावाच्या कुटुंबीयांशी वाद झाला होता. दोन्ही बाजूंनी पोलीस चौकीत तक्रार दिल्यानंतर मध्यस्थीने वाद मिटवण्यात आला होता. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी हवालदार वायाळ यांनी फोन करून घोडे यांना चौकशीसाठी पोलीस चौकीत बोलावले. तेथे उपनिरीक्षक गोविंद खटिंग यांनी दमदाटी करून मारहाण केली, मोबाईल हिसकावून घेतला, शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप घोडे यांनी तक्रारीत केला आहे. त्यांच्या कुटुंबीयांशी ही अपमानास्पद वर्तन झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.विशेष म्हणजे, संबंधित उपनिरीक्षकाची घटनेपूर्वीच अन्यत्र बदली झाली होती, असा दावा तक्रारदाराने केला आहे. त्यामुळे बदली आदेश, कार्यमुक्तीची तारीख आणि चौकशी करण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना होता का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वरिष्ठांकडे लेखी चौकशीची मागणी !

नावात बदल

माझ्या पासपोर्टवरील नाव साईपद्मा गणेसन संकर असे होते. माझ्या आधार कार्डवरील नाव बदलून साईपद्मा संकर असे करण्यात आले आहे. प्रतिज्ञा पत्र क्र. १७३/२६ नुसार साईपद्मा गणेसन संकर आणि साईपद्मा संकर ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत.

बिरजू मांढरे यांच्या वतीने सलग १५ वा पालखी सोहळा संपन्न!

नाथपंथिय, वारकरी संपद्रय व शेकडो साई भक्तांच्या उपस्तीत शिर्डीकडे पालखी चे प्रस्थान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : श्रद्धा, सबुरी आणि सबका मलिक एक हे या साईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करीत, व्यसन मुक्ती ,वृक्षारोपण,रक्तदान शिबिर च्या माध्यमातून सलग १५ वर्षे बारामती ते शिर्डी पायी पालखी सोहळा काढून सातत्य ठेवून असंख्य साई भक्त जोडणारे बारामती नगरपरिषदेचे मा.उपनगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक बिरजू मांढरे यांचा साई पालखी सोहळ्यास गुरुवार (दि.१२) नोव्हेंबर रोजी शुभारंभ करण्यात आला.

बारामती चे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या शुभहस्ते साई आरती करून प्रस्थान करण्यात आले या प्रसंगी नगरसेवक अमोल कावळे, अमर धुमाळ, सोमनाथ गजाकस,गणेश जोजारे व सूरज सातव , यादगार फौंडेशन चे फिरोज बागवान, शक्तिपात महायोग साधनधाम ट्रस्टचे स्वामी श्रीपातीर्थ महाराज,



नाथपंथीय जैनकवाडी ट्रस्ट चे सूरज महाराज थोरात व संतोष आटोळे, संतोष सातव , सतीश खुडे , प्रमोद डिंबळे,धनंजय तेलंगे, शिर्डी चे पै. मदन मोकाटे, रामभाऊ सोनवणे, अनिल आलवणे, बाबूशेठ , तानाजी सोनवणे, अजित सोनवणे, भिवा तांबे, गणेश घोडे, सागर सोनवणे व चांडाळ चौकटी च्या करामती चे अभिनेते भरत शिंदे, रामभाऊ जगताप, सुभाष मदने व इतर मान्यवर उपस्तीत होते.

साई बाबांच्या विचारांचा आदर करत डॉ आंबेडकर वसाहत उभारणी व इतर समाजउपयोगी कार्य केल्याने खरे साई सेवक असल्याचे बिरजू मांढरे यांनी दाखवून दिल्याचे नगराध्यक्ष सचिन सातव यांनी सांगितले.विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, व्यसन मुक्ती,डॉ आंबेडकर वसाहत मधील नागरिकांना विविध मदत केल्यानेच बिरजू मांढरे साई विचारांचे पाईक असल्याचे नाथपंथीय सूरज महाराज थोरात यांनी सांगितले. बारामती च्या अध्यात्मिक इतिहासात नोंद घ्यावी असा पायी पालखी सोहळा घेण्याचे श्रेय यांना जात असल्याचे स्वामी श्रीपातीर्थ महाराज यांनी सांगितले. अध्यात्म व विज्ञान च्या माध्यमातून साईबाबा चे विचार पालखी सोहळा मधून पसरवले जात असल्याचे ह.भ. पा कपिल महाराज चव्हाण यांनी सांगितले.

सर्व धर्म ,जात,पंथ यातील सर्वांना एकत्र करून अध्यात्मिक आनंद व संतुष्टता देण्याचे काम बारामती ते शिर्डी पायी पालखी सोहळा मध्ये होत असल्याचे प्रास्ताविक मध्ये बिरजू मांढरे यांनी सांगितले. साईच्छा सेवा ट्रस्ट, बीएम ग्रुप,वस्ताद लहुजी साळवे दहीहंडी मंडळ, कै भाऊसाहेब मांढरे मित्र परिवार,श्रीहरी भाऊ तेलंगे मंडळ, जय भवानी मित्र मंडळ यांनी उपस्तितांचे स्वागत केले तर सुत्रसंचालन सावळेपाटील यांनी केले व आभार राजू मांढरे यांनी मानले.

बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या
कसबा, बारामती जि.पुणे
फोन नं. ०२११२-२९९३७२, मो नं.९५४५४५००३५
Email - btd.pur@gmail.com

टेंडर नोटीस

आमच्या बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघास २०२७ सालाची दिनदर्शिका छपाई करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे ई. टेंडर मागविण्यात येत आहे.

अ.क्र	तपशील	पुरवठा/नग	बयाणा रक्कम रु.	कालावधी	टेंडर फी (ना परतावा रक्कम)
१	दिनदर्शिका सन २०२७	१७००० नग	१०००/-	१५ दिवस	१,०००/- जी.एस.टी (१८%)

सदर निवेदेतील मालाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी, शर्थी इत्यादी माहिती दि. १५/११/२०२६ सकाळी ११.०० पासून संघाच्या www.indiaengineering.com/baramatitender या वेबसाईटवरती गेल्यानंतर Currently Online Tenders ला क्लिक केल्यास पहावयास मिळतील. सदर ई टेडर प्रक्रिया अंतर्गत निविदा दि. १५/११/२०२६ सकाळी ११.०० ते दि.२०/११/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत ई टेडर पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

डॉ. योगेश वा. राणे, व्यवस्थापकीय संचालक
पुरुषोत्तम. शि. गाढवे, व्हा. चेअरमन
किशोर. भ. फडतरे, चेअरमन
बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ

द•ख•ल



समाजरत्न पुरस्काराने मच्छिंद्र आर्ले सन्मानित

शहरटाकळी : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी व पंचक्रोशीत आल्पावधितच नावारूपास आलेला व बारा कुटुंबांची कामधेनू बनलेला सन्मित्र स्वयं सहाय्यता पुरुष बचत गटाच्या माध्यमातून वार्षिक दिला जाणारा समाजरत्न पुरस्कार यावर्षी शेतकरी संघटनेचे लढवय्ये नेते मच्छिंद्र बाजीराव आर्ले पाटील यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.सदर पुरस्कारात मानाचा फेटा, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देण्यात आले. हा पुरस्कार गौरव सोहळा शहरटाकळी येथील हनुमान मंदिर सभागृहात संपन्न झाला. पुरस्कार सोहळ्याच्या उत्तरा दाखल मच्छिंद्र आर्ले यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांना शेतकरी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी माझा लढा सदैव सुरू राहील या कामी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून समाजासाठी काम करण्याचे आश्वासित केले. यावेळी सन्मित्र गटाचे अध्यक्ष राहुल मिसाळ, सचिव किशोर कोल्हे ,सदस्य दादा खराडे, अमोल कनके, अभय कोल्हे, देवीदास शेळके, सोण्याबापु मिसाळ, शिवकुमार पिंपळे, अमोल खंडागळे, काका कोल्हे, व सुर्यकांत खंडागळे सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणलोट विकास कार्यक्रमातून शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप



टाकळी ढोकेश्वर : शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, शेती अधिक सक्षम व आधुनिक व्हावी तसेच पाणलोट क्षेत्रातील शेती विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने नाबार्ड अर्थसहाय्यित पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत गावातील शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते लाभार्थी शेतकऱ्यांना या साहित्याचे वितरण करण्यात आले.शेती क्षेत्राच्या विकासासाठी पाण्याचे योग्य नियोजन, मृद व जलसंधारण तसेच आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज आहे. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आवश्यक शेती साहित्य उपलब्ध करून दिल्याने त्यांच्या शेतीकामाला निश्चितच मदत होणार आहे. अशा योजनांचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी सुजित झावरे पाटील यांनी सांगितले. यावेळी चेअरमन पी. डी. बर्वे,भाऊसाहेब सैद, शरदकाका पाटील,बाळासाहेब झावरे,नारायण झावरे, लहानभाऊ झावरे,बबन तळेकर गुरुजी,शांताराम झावरे,मधुकर भालेकर,शरद सैद,संतोष भालेकर,खंडू टोपले,सावित्रा टोपले,शिवराम सैद,विठ्ठल सैद, बाळासाहेब वाबळे यांच्यासह लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

'आविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी समर्थ कॉलेजच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील दोन विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील आदित्य कांबळे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग (-ख चङ) विभागातील अथर्व थोरात यांनी आपल्या संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन व संशोधनवृत्ती विकसित करणे या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनाच्या बळावर दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधन प्रकल्पांची प्रभावी मांडणी करत विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी स्थान मिळविले. या निवड प्रक्रियेत महाविद्यालयाचे शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक प्रा. सचिन शेळके यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच आविष्कार स्पर्धेच्या नियोजनापासून ते समन्वयापर्यंतची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे समर्थ कॉलेजमधील संशोधन, नवोपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले असून, विद्यापीठस्तरीय स्पर्धेतही विद्यार्थी उज्ज्वल यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

जामखेडच्या पाणीप्रश्नावर जिल्हाधिकारी ॲक्शन मोडवर

उजनीच्या दहिगाव योजनेला प्राधान्य!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



जामखेड : जामखेड शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी उजनी येथून येणाऱ्या दहीगाव पाणीपुरवठा योजनेचा प्राधान्याने पाठपुरावा सुरू असून, हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. तसेच जामखेड नगरपरिषदेच्या माध्यमातून पाणी शुद्धीकरण केंद्रासाठी (फिल्टर प्लांट) जागाही निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे दुष्काळाने होरपळणाऱ्या जामखेडकरांना लवकरच दिलासा देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली.

जामखेड तहसील कार्यालयात आयोजित दुष्काळी परिस्थितीच्या आढावा बैठकीदरम्यान त्या बोलत होते. यावेळी

भाजपचे ज्येष्ठ नेते मधुकर राळेभात, सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार, मनसे तालुकाध्यक्ष प्रदीप टापरे, जामखेड नगर परिषदेचे गटनेते तात्याराम पोकळे, नगरसेवक मेहेत्रे, विनायक राऊत, तहसीलदार शितल सावळे, गट विकास अधिकारी शुभम जाधव, नायब तहसीलदार मच्छिंद्र पाडळे , सार्वजनिक बांधकाम विभागाचे शशिकांत सुतार, तालुका वैद्यकीय अधिकारी सुनील बोराडे, मुख्याधिकारी अजय साळवे तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी जामखेड तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा व पाणी, तसेच दुष्काळ निवारणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

जामखेड तालुक्यातील सातेफळ येथील पिण्याच्या पाण्याच्या उद्भवाची पाहणी करून उपलब्ध पाणीसाठ्याची माहिती घेण्यात आली. नान्नज येथील शेतकरी शहाजी राजेभोसले यांच्या म्हशीच्या तबेल्याला भेट दिली जनावरांच्या चाऱ्याच्या प्रश्नावरही चर्चा करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी आणि जनावरांना चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावावेत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता पिण्याच्या पाण्यासाठी कर्जत तालुक्यातील मांदळी येथूनही जामखेडला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी सांगितले.

दरम्यान, रोजगार हमी योजनेअंतर्गत ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे, अशा ठिकाणी चारा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी मोफत बियाणे वाटप आणि त्यासाठी अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू आहे. जनावरांना चारा कमी पडू नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जलवाहिनीसाठी मार्ग मोकळा करून द्यावा : नगरसेवक काशीद

जामखेड शहर सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करीत आहे. दहीगाव-जामखेड ही महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजना शहरासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेची जलवाहिनी खर्डा रोडमार्गे लक्ष्मी चौकापर्यंत येणार आहे. मात्र, खर्डा रोडवरील अनेक ठिकाणच्या अतिक्रमणांमुळे जलवाहिनी टाकण्याच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे खर्डा रोडवरील अतिक्रमणांची मोजणी करून ती तातडीने हटवावीत, रस्त्याचे आवश्यक रुंदीकरण करावे आणि जलवाहिनीसाठी मार्ग मोकळा करून द्यावा, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नगरसेवक संजय काशीद यांनी दिले आहे.

यशवंत विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

जुन्या आठवणींना उजाळा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शिराळ : येथील ऐतिहासिक व शैक्षणिक परंपरा असलेल्या यशवंत विद्यालय, शिराळ येथे भूतकाळ आणि वर्तमानाचा सुंदर संगम घडवून आणणारा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात पार पडला. १९६५ ते २०२६ या तब्बल ६१ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीतील आजी-माजी विद्यार्थी या मेळाव्यानिमित्त पुन्हा एकदा आपल्या शालेय जीवनातील जुन्या आठवणींमध्ये रमले होते.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे यामध्ये विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. यामध्ये शिक्षक, डॉक्टर, वकील, पोलीस, इंजिनिअर, व्यावसायिक तसेच शेतकरी अशा विविध क्षेत्रांत देशविदेशात व समाजात उल्लेखनीय कामगिरी बजावणारे शिराळचे सुपुत्र आवर्जून उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवताच सर्वांच्या चेहऱ्यावर बालपणीच्या आणि शालेय दिवसांच्या आठवणींचा आनंद स्पष्ट दिसत होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब वाघ हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव घोरपडे, माजी सरपंच शंकरराव तुपे, सरपंच रविंद्र मुळे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल वाघ हे व्यासपीठावर उपस्थित होते.

यानंतर झालेल्या मनोगत सत्रात अंबीरभाई शेख, राजेंद्र जावळे, बाबासाहेब मुळे, देविदास थोरात, सुरेश पाथरकर, हरिभाऊ दगडखैर, सिताराम तागड आणि क्षेत्रे सर यांनी आपल्या शालेय जीवनातील नटखट आठवणी, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि शाळेसोबतच्या जुन्या जोडलेल्या भावनिक नात्यांना उजाळा दिला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या जुन्या आठवणींना दाद दिली.

३८४ वा साप्ताहिक शिव अभिषेक ईश्वर कातकडे यांच्या हस्ते संपन्न



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : शेवगाव शहरात गेल्या आठ वर्षांपासून अखंडितपणे सुरू असलेला साप्ताहिक शिव अभिषेक सोहळ्याचा ३८४ वा सप्ताह अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट प्रकरणात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल भारत सरकारच्या केंद्रीय गृह मंत्रालयाकडून ईश्वर कातकडे यांना प्रतिष्ठित 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक' जाहीर झाले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिव अभिषेक समिती आणि शेवगावकरांच्या वतीने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. समितीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत महाराज लबडे यांच्या हस्ते कातकडे यांचा महाराजांचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला. व सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले

यावेळी मनोगत व्यक्त करताना ईश्वर कातकडे म्हणाले की, शेवगावसह राज्यभरात गेल्या आठ वर्षांपासून अखंडितपणे चंद्रकांत महाराज लबडे यांनी शिवकार्याचा जो वसा हाती घेतला आहे, ते अत्यंत उल्लेखनीय आणि कौतुकास्पद आहे.

गेल्या आठ वर्षांपासून दर शुक्रवारी विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक व पूजन करण्यात येते. या उपक्रमातून शिवविचारांचा प्रसार आणि सामाजिक एकोपा जपण्याचे कार्य केले जात आहे.

यावेळी नानासाहेब कातकडे, नवनाथ कवडे, अमोल घोलप, लांडे आबा, लक्ष्मण मडके, सुरेश कोरडे, संदीप मुंडे, दीपक शेंडे, रामानंद मुंगसे, कल्याण घोणे, धनंजय झिरपे, वैभव खरात यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

खाकी वर्दीतील माणुसकीचा अनोखा दीपोत्सव!

कर्जत प्रशासना कडून दिवाळीनिमित्त कपड्यांची भेट!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा लखलखाट नव्हे, तर प्रेम, आपुलकी, माणुसकी आणि आनंदाची उधळण करणारा सण! याच सणाचे औचित्य साधत खाकी वर्दीतील कर्तव्यनिष्ठ हातांनी माणुसकीचा दिवा पेटवत संस्कार बाल आश्रम, राशीन येथील चिमुकल्यांची दिवाळी अविस्मरणीय केली. कर्जत पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपत बाल आश्रमातील विद्यार्थ्यांना नवीन कपड्यांची भेट देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविले.

पोलीस उपनिरीक्षक श्री. बाळासाहेब मुळीक यांच्या संकल्पनेतून हा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये पोलीस कॉन्स्टेबल श्री. मनोज मुरकुटे, पोलीस कॉन्स्टेबल श्री. प्रवीण सुतार आणि पोलीस कॉन्स्टेबल श्री. विशाल शिरसागर यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिवाळीच्या निमित्ताने बाल आश्रमातील विद्यार्थ्यांना नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. नवीन कपडे हातात पडताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, त्यांच्या डोळ्यांतील चमक आणि निरागस हास्य हेच या उपक्रमाचे खरे समाधान ठरले. खाकी वर्दी म्हटले की कायदा, शिस्त, सुरक्षा आणि कर्तव्य यांचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते; मात्र याच खाकी वर्दीच्या आत समाजातील दुःख जाणणारे, गरजूंच्या वेदनांशी नाते जोडणारे आणि निरागस चेहऱ्यांवर आनंद फुलविणारे संवेदनशील मनही असते, याचा प्रत्यय या उपक्रमातून आला. समाजाचे रक्षण करताना सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणाऱ्या या पोलीस कर्मचाऱ्यांनी खऱ्या अर्थाने माणुसकीचा दीपोत्सव साजरा केला.

याप्रसंगी युवा उद्योजक श्री. विजय शेठ सौताडे, सौ. अश्विनी शरदचंद्र आढाव उपस्थित होते. जनजागृती सामाजिक युवा प्रतिष्ठान संचलित संस्कार बाल आश्रम, राशीन येथे हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे अध्यक्ष श्री. शरदचंद्र आढाव यांच्या वतीने या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. खाकी वर्दीचा रुबाब कर्तव्यातून दिसतो; पण त्या वर्दीतील माणुसकी जेव्हा एखाद्या चिमुकल्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवते, तेव्हा तिचा खरा सन्मान होतो! कायद्याचे रक्षण करणाऱ्या हातांनी निरागस बालकांच्या आनंदाचीही जबाबदारी स्वीकारली, हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आणि माणुसकीचा सुंदर संदेश देणारा ठरला.

वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमाला महिनाभराचा किराणा भेट

सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

एरंडगाव : वाढदिवस म्हटले की जल्लोष, उत्सव आणि खर्चिक कार्यक्रम आलेच; मात्र या परंपरेला फाटा देत शेवगाव नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक आठचे नगरसेवक निलेश फुलचंद रोकडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी महिनाभराचा किराणा भेट देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. त्यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नगरसेवक निलेश रोकडे यांनी वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च आणि दिखाऊपणा टाळून गुरुदत्त शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, शेवगाव यांच्या माध्यमातून वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना संपूर्ण महिन्याचा किराणा साहित्य देऊन सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली.

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आयुष्यातील अमूल्य काळ कुटुंबासाठी, समाजासाठी आणि पुढील पिढ्यांच्या जडणघडणीसाठी खर्ची घातला आहे. अशा ज्येष्ठांच्या जीवनात थोडासा आधार आणि आनंद निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि त्यांनी दिलेले आशीर्वाद हीच वाढदिवसाची खरी भेट असल्याची भावना यावेळी नगरसेवक निलेश रोकडे यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अर्जुन तात्या फडके, सचिव फुलचंद अण्णा रोकडे, ज्येष्ठ साधक बाबूशेठ जोशी, पी. बी. शिंदे, गुरुवर्य फलके सर, श्रीकांत गोरे भाऊसाहेब, ज्येष्ठ साधक सुरेश घुले तात्या, बाळासाहेब मुरदारे (कॉन्ट्रॅक्टर), बाबा गोसावी, दुबाले साहेब, सौ. प्रतीक्षा शेळके-फडके, सौ. डॉ. पूजा भागवत-रोकडे यांच्यासह संपूर्ण रोकडे परिवार उपस्थित होता.

वाढदिवस साजरा करताना केवळ स्वतःचा आनंद न पाहता समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न करणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. नगरसेवक निलेश रोकडे यांनी आपल्या कृतीतून सेवाभावाचा आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या या उपक्रमातून समाजाला प्रेरणादायी संदेश मिळाला आहे.

'वाढदिवसानिमित्त किती शुभेच्छा मिळाल्या यापेक्षा आपल्या कृतीतून किती जणांच्या जीवनात आनंद निर्माण झाला, हेच अधिक महत्त्वाचे आहे,' हा संदेश त्यांच्या उपक्रमातून अधोरेखित झाला.

अभ्यासिकेच्या छोट्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करा

अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : अभ्यासिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा पाया भक्कम करून या छोट्याशा रोपट्याचे भविष्यात मोठ्या वटवृक्षात रूपांतर करायचे आहे. यश मिळविण्यासाठी कोणताही 'शॉर्टकट' नसतो.

केवळ प्रामाणिक मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावरच ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिकारी होऊ शकतात, असा प्रेरणादायी संदेश चंद्रपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी दिला.

शेवगाव तालुक्यातील जोहरापूर येथील 'यश फाउंडेशन'च्या वतीने ग्रंथालय आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

या वेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यशाचे गमक सांगितले.

अनुभवातून यशाकडे वाटचाल विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षा देण्यापुरते मर्यादित न राहता विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे. प्रत्येक परीक्षेतून मिळालेला अनुभव गाठीशी बांधून आपल्या चुका सुधाराव्यात आणि यशाच्या दिशेने वाटचाल करावी.

वारकरी जसे निष्ठेने अभ्यास करतात तशीच अभ्यासाची सवय लावून घेऊन मनापासून आवड निर्माण करावी. ज्या तळमळीतेने आणि श्रद्धेने वारकरी पंढरपूरच्या वारीला जातात, त्याच तन्मयतेने विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहून अभ्यासात रममाण व्हावे.

आजच्या डिजिटल युगात फेसबुक, इंस्टाग्राम आणि मोबाईलवरील अनावश्यक गोष्टी अभ्यासात मोठे अडथळे ठरत आहेत. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा मोह टाळून मोबाईलचा वापर केवळ ज्ञानार्जनासाठीच करावा.

वेळेचे अचूक नियोजन करून अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजपासूनच नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करावी. वेळेचे महत्त्व ओळखून प्रत्येक दिवसाचा वापर आपल्या ध्येयपूर्तीसाठी करावा.

ग्रामीण भागातून अधिकारी घडविण्याचा मानस या अभ्यासिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी पोषक वातावरण, योग्य दिशा आणि प्रेरणा मिळावी, जेणेकरून या उपक्रमातून भविष्यात अनेक प्रशासकीय अधिकारी घडावेत, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी मेजर विनोद शेळके ,शिवाजी बडे ,केदार भक्तराज ,विलास जाधव ,अशोक देवढे ,महादेव पवार, प्राध्यापक परमेश्वर ढगे सुरेश पंडित, शेषेराव आपशेटे , पत्रकार प्रा . जनार्दन लांडे, रावसाहेब मरकड, रामनाथ रुईकर, राजेंद्र पानकर, तारामती दिवटे याच्यासह विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब देवढे महाराजांनी केले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.१५ नोव्हेंबर २०२६ । पान ८

शनिशिंगणापूरात भाविकांची वाहने अडवून पूजेचे साहित्य खरेदीसाठी दबाव; दोघांवर गुन्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : जगप्रसिद्ध श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची चारचाकी वाहने रस्त्यावर अडवून त्यांना पूजेचे साहित्य स्वतःच्या दुकानातून खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या दोघांविरुद्ध शनिशिंगणापूर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास शनिशिंगणापूर येथील अध्यक्ष पार्किंग परिसरात ही घटना घडली. यावेळी आरोपींनी भाविकांची चारचाकी वाहने रस्त्यावर अडवून त्यांना पुढे जाण्यास प्रतिबंध केला. तसेच भाविकांनी पूजेचे साहित्य आपल्याच दुकानातून खरेदी करावे, यासाठी त्यांना प्रवृत्त करत असल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलिस ठाण्यात घोडेगाव येथील गणेश रामसाहेब ब्राह्मणे (वय २७) याच्याविरुद्ध, तर कारेगाव येथील नव नाथ रामदास शिरसाठ (वय ३५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बंधाऱ्यांत पाणी सोडण्यासाठी शेतकरी आक्रमक

आज समृद्धी महामार्ग रोखण्याचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : गोदावरी नदीवरील श्रीरामपूर वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभदायक असलेल्या वांजरगांव, खानापूर, कमालपूर या तीन बंधाऱ्यात पाणी सोडावे या मागणीसाठी नागमठाण गोदावरी नदी पुलावर वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील गावोगावच्या शेतकऱ्यांचे आमरण उपोषणाच्या चौथ्या दिवशी दोन्ही तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून उपोषण कर्त्याची चौकशी तर सर्वपक्षीय राजकीय नेत्यांच्या भेटी व पाठिंब्याचा ओघ उपोषणस्थळी वाढत असून आज ग्रामीण भागातील रस्त्यावर रास्ता रोको केले. मात्र ऊद्या रविवार दि.१५ नोव्हेंबर रोजी शासनाने ठोस निर्णय दिला नाही.तर समृध्दी महामार्गाकडे आगेकूच करणार असल्याचा इशारा सर्वपक्षीय आंदोलक शेतकऱ्यांनी दिला आहे.



आमरण उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांनी यापूर्वी १५ ऑक्टोबरला केलेले आंदोलन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी ४-५ दिवसात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून हक्काचे पाणी देतो असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते व विनंतीवरून आंदोलन स्थगित केले होते. मात्र तब्बल महिना भरात कार्यवाही न झाल्याने बुधवार ११ नोव्हेंबर २०२६ पासून शेतकरी संघटनेचे वैजापूर तालुकाध्यक्ष गणेश तांबे यांच्या सह सर्वपक्षीय दहा शेतकऱ्यांनी उपोषण सुरू केले. तीनही केटी वेअर किमान ५०% भरणे, नांदूर-मधमेश्वर येथून सोडलेल्या पाण्याची लेखी माहिती देणे, वरील बंधाऱ्याच्या फळ्या पोलीस बंदोबस्तात काढने. वैजापूर-श्रीरामपूरच्या किमान १०० गावांच्या पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याची गरज या प्रमुख मागण्यासाठी,शेतकरी संघटनेसह सर्वपक्षीय शेतकरी उपोषणास बसले आहेत.

त्यांना साथ देण्यासाठी गावोगावचे शेकडो शेतकरी उपोषणस्थळी तळ ठोकून आहेत. रविवारी नाऊर जाफराबाद रामपुर भागातील शेकडो शेतकरी उपोषणस्थळी येऊन बसणार आहेत. दररोज सायंकाळी किर्तन तर रात्रभर भजन जागर घेण्यात येत आहे. आतापर्यंत उपविभागीय अधिकारी वैजापूर जऱ्हाड, तहसीलदार सावंत, पाटबंधारे विभाग श्रीरामपूरचे उपअभियंता कल्हापुरे, एन बी कॅनॉल शाखा अभियंता शेख यांनी भेटी देऊन, आम्ही दिड टी एम सी पाणी सोडण्याचे लेखी पत्र वरिष्ठ कार्यालयास दिलेले आहे. एवढेच आतपर्यंत आश्वासन दिले आहे.

आज शनिवार दि.१४ रोजी संभाजीनगर जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, अजय साळुंके, सामाजिक कार्यकर्त्या आनंदी अन्नदाते, बाबासाहेब जानराव आदींनी भेट देऊन पाठिंबा व्यक्त केला. मात्र दोन्ही तालुक्यातील व आमदार, खासदार उपोषणस्थळी फिरकले नसल्याने शेतकऱ्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. विरगांव पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदिप भिवसाने यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला सायंकाळी ७ वाजता श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याच्या प्राशिक्षणार्थी डि वाय एस पी कल्पना पवार याही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

जेजुरीच्या खंडोबारायांना नेवासा येथील म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरी येथील श्री खंडोबारायांना त्यांची सासुरवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेवासा येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण करण्यात आला. माहेरच्या देवस्थानाकडून जेजुरी गडावर बेलभंडारा अर्पण करण्याची ही धार्मिक परंपरा भक्तिभावाने पार पडली.

नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या जीर्णोद्धार कमिटीच्या वतीने संभाजी ठाणगे, राजेंद्र काशीद तसेच देवस्थानचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या पुढाकाराने नेवासा येथून बेलभंडारा जेजुरी येथे नेण्यात आला.

सर्वप्रथम जेजुरी येथील कडेपठारावर जाऊन तेथील श्री खंडोबारायांना बेलभंडारा अर्पण करण्यात आला. यावेळी विधिवत तळीभंडार करण्यात आल्यानंतर म्हाळसादेवीचा बेलभंडारा खंडोबारायांच्या चरणी वाहण्यात आला.त्यानंतर नव्या मुख्य गडावर जाऊन तेथेही श्री खंडोबारायांना बेलभंडारा अर्पण करून पारंपरिक पद्धतीने तळीभंडार सोहळा पार पडला.

यावेळी मुख्य पुजारी निलेश बारभाई यांनी म्हाळसादेवीचे माहेर असलेल्या नेवासाहून आलेले संभाजी ठाणगे व राजेंद्र काशीद यांचा श्रीफळ व प्रसाद देऊन सन्मान केला.जेजुरी गडावरील मुख्य देवदेवतांनाही नेवासा येथील म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण करण्यात आला. यावेळी भाविकांनी भक्तिभावाने खोबऱ्याची उधळण करीत 'येळकोट येळकोट जय मल्हार' च्या जयघोषात धार्मिक सोहळा साजरा केला.

नेवासा हे म्हाळसादेवीचे माहेर आणि जेजुरी हे खंडोबारायांचे मुख्य श्रद्धास्थान असल्याने या दोन्ही तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या धार्मिक उपक्रमातून श्रद्धा, परंपरा आणि भक्तिभावाचे अनोखे दर्शन घडले.

मैत्रीच्या संबंधातून तरुणाला हनीट्रॅपमध्ये अडकवून मारहाण

महिलेसह पाच जणांवर गंभीर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : दोन वर्षांपासून असलेल्या मैत्रीच्या संबंधांचा गैरफायदा घेत एका महिलेने राहुरी तालुक्यातील तरुणाला हनीट्रॅपच्या जाळ्यात अडकवून ब्लॅकमेल केल्याचा प्रकार समोर आला आहे. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर संबंधित महिलेने पाच जणांसह तरुणाच्या घरात घुसून त्याला बेदम मारहाण केली. तसेच त्याच्या तोंडात जबरदस्तीने औषध ओतून मोबाईल आणि ११ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतल्याचा आरोप पीडित तरुणाने केला आहे.

सुरज अशोक घोडके (वय २५, रा. कानडगाव, ता. राहुरी) असे पीडित तरुणाचे नाव आहे. तो शेती व्यवसायासह जनावरांच्या व्यापाराचा व्यवसाय करतो. त्याने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, दोन वर्षांपूर्वी त्याची शिर्डी येथील हेमा नामक महिलेशी ओळख होऊन मैत्री झाली होती. या मैत्रीचा गैरफायदा घेत संबंधित महिलेने त्याच्याकडून वेळोवेळी हजारो रुपये घेतले. त्यानंतर पैशांसाठी ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास संबंधित महिलेने फोन करून पैशांची मागणी केली. मात्र, सुरजने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे त्याने म्हटले आहे. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी पहाटे सव्वापाचच्या सुमारास संबंधित महिला पाच जणांसह सुरजच्या घरी पोहोचली. घराचा दरवाजा तोडून सर्वजण आत घुसले.

त्यांनी सुरजचा मोबाईल आणि ११ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतली. तसेच लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्याच्या तोंडात जबरदस्तीने औषध ओतल्याचा आरोपही प्रसिद्धीपत्रकातून करण्यात आला आहे.

या घटनेत जखमी झालेल्या सुरजवर लोणी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती त्याने लोणी, राहुरी तसेच ११२ क्रमांकावर दूरध्वनी करून पोलिसांना दिल्याचे सांगितले. मात्र, अद्याप पोलिसांकडून दखल घेतली जात नसून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्याने केला आहे. आपल्या जीविताला धोका असल्याचे सांगत या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी सुरज घोडके याने केली आहे.

घोडेगाव येथे कांदा भाव स्थिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

घोडेगाव : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपआवारात शनिवार (दि.१४) रोजी कांदा भाव स्थिर राहिले आसुन नवीन लाल कांद्याच्या एक अर्ध्या लॉटसाठी ६० रुपये प्रति किलो भाव मिळाला तर गावरान जुन्या कांद्याला ५० रुपये भाव मिळाला तर सरासरी ४० ते ४४ रुपये भाव मिळाल्याची माहिती रतीलाल गांधी तसेच बद्रीनाथ गुंड यांनी दिली. दीवाळी निमित्त एक आठवडा बंद असलेल्या आवारात पहील्याच दिवशी कांदा आवक कमी होती यामध्ये एकुण १५ हजार आठशे ७० कांदा गोण्यांची आवक झाली होती यात लाल कांद्याच्या ८ हजार दोनशे ६५ कांदा गोण्यांची आवक झाली होती काल झालेल्या कांदा लिलावात एक नंबर कांद्याला ४४ ते ४८ रुपये दोन नंबर कांद्याला ४० ते ४४ रुपये नंबर कांद्याला ३० ते ३२ रुपये भाव मिळाला तर हालख्या कमी कलर कांद्याला १०ते २५ रुपये भाव मिळाला. नवीन लाल कांद्याला बाहेर देशात मोठ्या प्रमाणावर मागणी होत असल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात कांदा आवक असतांनाही कांदा भाव स्थिर राहिले आहेत पुढेही चांगल्या कांद्याला आणखी भाव मिळु शकतो.



पहाटेच्या अंधारात मातीची लूट!

पाच जणांवर गुन्हा; दोन जेसीबीसह तीन हायवा जप्त,

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लोणी व्यंकनाथ गावाजवळील शेंडेवाडी शिवारात पहाटेच्या अंधाराचा फायदा घेत शेतजमिनीतून जेसीबीच्या साहाय्याने मातीचे उत्खनन करून हायवांमधून चोरटी वाहतूक सुरू असल्याचा प्रकार १४ नोव्हेंबर रोजी पहाटे उघडकीस आला. या कारवाईत दोन जेसीबी आणि तीन हायवा अशी पाच वाहने समोर आली असून, पाच जणांविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे साडेतीनच्या सुमारास शेंडेवाडी शिवारातील शेतातून जेसीबीच्या साहाय्याने मातीचे उत्खनन करून ती हायवांमध्ये भरली जात होती. कोणतीही अधिकृत परवानगी नसताना पर्यावरणाची हानी होत असल्याची जाणीव असूनही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी देविदास पळसे यांनी फिर्याद दिली असून, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेड पोलीस उपनिरीक्षक भैलुमे तपास करीत आहेत.

महसूल यंत्रणेच्या नजरेतून अवैध उत्खनन सुटतेच कसे?

रात्रीच्या अंधारात जेसीबी लावून मातीचे उत्खनन आणि एकापाठोपाठ हायवांमधून वाहतूक होत असेल, तर अशा प्रकारांना आळा घालण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांचे नियंत्रण नेमके कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. केवळ गुन्हे दाखल करून हा प्रश्न सुटणार नाही. उत्खननासाठी जागा कोणाची, माती कुठे नेली जाणार होती, परवानगी होती का आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचे हितसंबंध आहेत, याचाही तपास होणे गरजेचे आहे.श्रीगोंद्यात मातीची लूट थांबणार कधी? प्रशासन आता तरी जागे होणार का? हा प्रश्न या कारवाईनंतर पुन्हा चर्चेत आला आहे.

पाच आरोपींची नावे

सुशांत संजय दळवी (वय २८, रा. पारगाव सुद्रिक)

दत्तात्रय राजेंद्र भागवत (वय ३०, रा. लोणी व्यंकनाथ)

संदीप राजेंद्र क्षिरसागर (वय २७, रा. लोणी व्यंकनाथ)

संतोष अशोक अडागळे (वय २३, रा. टाकळी लोणार)

विनोद लालासाहेब काकडे (वय ३५, रा. लोणी व्यंकनाथ)

पाच वाहने पोलिसांच्या कारवाईत

जप्तीच्या कारवाईत समोर आलेली वाहने

दोन पिवळ्या रंगाचे जेसीबी (एमएच १६ डीएस ७८५५ व एमएच १६ डीझेड ४५३२)

एएमडब्ल्यू हायवा (एमएच १२ एचडी ३७८२)

एएमडब्ल्यू हायवा (एमएच १२ एचडी १२२६)

अशोक लेलँड हायवा (एमएच १४ जेएल ९९९६)

जामखेडच्या पाणीप्रश्नावर प्रा. मधुकर राळेभात आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जामखेड : शहरासह तालुक्यातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत असून, शहराला १५ ते २० दिवसांनी पाणी मिळत आहे. वाड्या-वस्त्यांसाठी १५ टँकर मंजूर झाले असताना शहरासाठी मात्र स्वतंत्र टँकरची व्यवस्था करण्यात आलेली नाही. प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अन्यथा न्यायालयात जाणार असल्याचा इशारा प्रा. मधुकर राळेभात यांनी पत्रकार परिषदेत दिला. शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. किमान आठ दिवसांनी नियमित पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. १५ दिवसांनी पाणी मिळणार असेल तर नागरिकांनी एवढे पाणी साठवायचे कुठे? असा सवाल त्यांनी केला. वाढती लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेता उपलब्ध स्रोतांमधून होणारा पुरवठा अपुरा पडत आहे. मंजूर टँकर प्रत्यक्षात सुरू करून शहरालाही पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. शेतीसाठी कुकडी व कृष्णा खोऱ्यातून जामखेडला पाणी मिळाले पाहिजे. शेजारील आष्टी, परांडा, भूम आणि करमाळा तालुक्यांना पाणी मिळत असताना जामखेडवर अन्याय का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उजनीच्या पाणी योजनेला गती देऊन शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवावा. तसेच पुढील दीड वर्षाचे पाणी नियोजन आतापासून करावे, अशी मागणीही त्यांनी केली. पाणीटंचाईमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याऐवजी ठोस उपाययोजना कराव्यात, असे ते म्हणाले. जामखेडला पाणी मिळण्यासाठी योग्य निर्णय न झाल्यास न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात रब्बीच्या ५७ लाख हेक्टर पैकी अवघ्या ४ लाख हेक्टरवरच पेरणी

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : राज्यात यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे रब्बी हंगामातील पेरण्यांना मोठा फटका बसला आहे. आतापर्यंत रब्बीच्या सरासरी क्षेत्राच्या केवळ ८ टक्के क्षेत्रावर म्हणजेच संपूर्ण राज्यात अवघ्या ४ लाख ५९ हजार २१० हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. यामध्ये ज्वारीचे क्षेत्र सर्वाधिक असून, आतापर्यंत २ लाख ३ हजार ५४० हेक्टरवर ज्वारीची पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी संपूर्ण रब्बी हंगामात ज्वारीची १३ लाख ८९ हजार हेक्टरवर पेरणी झाली होती.

गेल्या वर्षी दिवाळीनंतरही परतीचा पाऊस सुरू असल्याने ज्वारीची पेरणी उशिराने झाली होती. मात्र, यंदा पेरणीची शक्यता कमी होताना दिसत आहे. ज्वारी आणि हरभऱ्याचे प्रमुख उत्पादन घेणाऱ्या भागांमध्येच दुष्काळाची तीव्रता अधिक असल्याचे पेरणीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. राज्यात रब्बीचे सरासरी ५७ लाख ८० हजार ४१७ हेक्टर क्षेत्र आहे. रब्बी हंगामात प्रामुख्याने ज्वारी, मका, गहू आणि हरभरा ही पिके घेतली जातात. ज्वारीची साधारणतः ३० ऑक्टोबरपर्यंत, हरभऱ्याची डिसेंबरअखेरपर्यंत, तर गव्हाची जानेवारीपर्यंत पेरणी केली जाते.

हरभरा आणि मक्याची पेरणीही कमी

हरभऱ्याचे सरासरी क्षेत्र २५ लाख १६ हजार ६२७ हेक्टर आहे. त्यापैकी आतापर्यंत १ लाख ७८ हजार ५५१ हेक्टरवर म्हणजेच ७ टक्के पेरणी झाली आहे. हरभऱ्याची नोव्हेंबरअखेरपर्यंत पेरणी होत असल्याने आणि हे पीक कमी पाण्यावर येत असल्याने त्याचे क्षेत्र आणखी वाढण्याची शक्यता आहे. दिवाळीनंतर अवकाळी पाऊस झाल्यास चाऱ्याच्या आशेने ज्वारीच्या क्षेत्रातही वाढ होऊ शकते. मक्याचे सरासरी क्षेत्र पावणे चार लाख हेक्टर असून, आतापर्यंत ४९ हजार ३१४ हेक्टरवर म्हणजेच १३ टक्के पेरणी झाली आहे.



चारा उत्पादनासाठी ज्वारीला प्राधान्य

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने पाणी उपलब्ध असलेल्या भागांमध्ये चारा पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.ज्वारीचे पीक चांगले आले नाही, तरी थोडेफार उत्पादन मिळाल्यास जनावरांसाठी चारा उपलब्ध होईल, या आशेने अनेक शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली आहे.

ज्वारीचे जिल्हानिहाय पेरणी क्षेत्र (हेक्टर) कंसात सरासरी क्षेत्र दिले आहे

धुळे : ९४० (११,९४४), जळगाव : ९,४५९ (४४,७९७), अ. नगर : ३०,५१३ (१,६२,९०९), पुणे : ८,२२६ (८८,३३७), सोलापूर : २९,९९२ (२,७५,०८८), सातारा : १५,२९१ (१,२३,७८४), सांगली : २७,४२४ (१,२६,०२९), कोल्हापूर : १,१६८ (११,८६७), छ. संभाजीनगर : १,६७१ (४४,११९), जालना : ३,३५२ (१,०२,१५८), बीड : ३८,३४२ (१,२८,१०९), लातूर : २,७२० (३३,००९), परभणी : १२,२४९ (९७,४६५), हिंगोली : २,७४० (९,५६५), बुलडाणा : २,१०४ (१६,१२०)

शिर्डीत साई भक्तांच्या बसला आग, चालकाच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

सर्व भाविक सुखरूप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : साई भक्तांची वाहतूक करणाऱ्या भाविकांच्या बसला अचानक आग लागल्याने मोठा अनर्थ टळला असून चालकाच्या सतर्कतेमुळे सर्व भाविकांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. काल शिर्डी पोलीस ठाण्या समोरील रोडने साई संस्थानची एमएच १७ बी वाय २२७४ ही बस जात असताना इलेक्ट्रॉनिक वायरिंगमध्ये बिघाड झाल्याने ही घटना घडली.

सदर बस साई भक्तांना भरून निघाली होती. टर्न घेत असताना अचानक गाडीने करंट गायब झाला व त्याचवेळी वायरिंगमध्ये स्पार्क झाला. गाडीच्या मधोमध असलेल्या बोनट मधून धूर निघू लागला आणि थोडी आगही दिसू लागली. परंतू चालक आणि मदतनीस यांनी क्षणाचाही विलंब न करता मोठी सतर्कता दाखवली. त्यांनी तात्काळ बसचे इमर्जन्सी दरवाजे उघडून सर्व भाविकांना सुखरूप खाली उतरवले. तसेच फायर सिलेंडरचा वापर करून आग आटोक्यात आणली. घटनेची माहिती मिळताच अवघ्या पाच मिनिटांत सर्व यंत्रणा आणि अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

खाते प्रमुख अतुल वाघ आणि प्रशासकीय अधिकारी यांनी झटपट यंत्रणा पाठवली. त्यामुळे झालेली वाहतुकीची कोंडीही तात्काळ दूर करण्यात आली.या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि बसचेही कोणतेही नुकसान झाले नाही. सर्व भाविक सुखरूप आहेत.